# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १९५) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.०१ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## ४५ लाख रुपयांची लाच घेताना वन अधिकाऱ्याला बेड्या, प्रशासनात खळबळ

बीड दि.३१ (प्रतिनिधी)- मुंबईत लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने धाड टाकून महापालिकेतील एका सुपरवायजरला रंगेहात अटक केली होती. ४० हजारांची लाच स्वीकारताना ही कारवाई करण्यात आली होती. विशेष म्हणजे, गेल्या काही महिन्यात एसीबीच्या कारवाईचा धडाका पाहायला मिळत असून अनेक सरकारी नोकरदार लाच घेताना जाळ्यात अडकत आहेत. आता, बीड जिल्ह्यातही आज मोठी खळबळ उडवणारी कारवाई झाली आहे. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीला उपस्थित राहिल्यानंतर, विभागीय वन अधिकाऱ्यास त्यांच्याच घरी लाच घेताना रंगेहात अटक करण्यात आली. बीडमधील या कारवाईने जिल्ह्याच्या प्रशासकीय वर्तुळात खळबल उडाली आहे.

उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार दोन दिवसीय बीड दौऱ्यावर असून आज त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यासंमवेत, जिल्हा नियोजन समितीची बैठक घेतली. यावेळी, जिल्हा विकासाच्या दृष्टीने त्यांनी काही महत्त्वाच्या सूचनाही केल्या आहेत. विशेष म्हणजे, या बैठकीला उपस्थित राहिलेल्या अधिकाऱ्यास काही तासांतच लाच घेताना रंगेहात अटक करण्यात आली. श्रीनिवास लखमावाड असे लाचखोर अधिकाऱ्याचं नाव असून त्यांच्या राहत्या घरी ४५ लाख रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्यास रंगेहाथ पकडले. या कारवाईमुळे जिल्ह्यातील प्रशासकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

# राज्यात सलग आठव्या दिवशी मुसळधार

## नाशिक घाटमाथ्याला रेड, संभाजीनगर-जालन्याला यलो अलर्ट; यवतमाळ-हिंगोलीत कार पुरात वाहून गेल्या

नाशिक / छत्रपती संभाजीनगर दि.३१ (प्रतिनिधी)- राज्यात सलग आठव्या दिवशीही पावसाचा जोर कायम असून विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी मुसळधार सरी कोसळत आहेत. नाशिक घाटमाथ्यासाठी रेड अलर्ट, तर छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील काही भागांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. गडचिरोलीत पूरस्थिती निर्माण झाली असून जळगाव, विदर्भ आणि नांदेडच्या किनवट तालुक्यात जोरदार पावसाची नोंद झाली आहे. दरम्यान, जून-जुलै या दोन महिन्यांत राज्यात सरासरीच्या तुलनेत केवळ ९६.४ टक्के, तर मराठवाड्यात ८२.१ टक्के पावसाची नोंद झाली आहे.

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील शिवथर खोऱ्यात संततधार पावसामुळे नद्या-नाले दुथडी भरून वाहत आहेत. कुंबे शिवथर येथील पुलावरून पाणी वाहत असल्याने आंबेनळी, आंबे शिवथर आणि सह्याद्री वाडी या ३ गावांचा तालुक्याशी संपर्क तुटला आहे.

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यात मुसळधार पावसामुळे दिवशी घाटात दोन ठिकाणी दरड कोसळल्याने ढेबेवाडीनवरस्ता मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. तसेच वाढत्या पाण्यामुळे जुना संगमनगर पूल पाण्याखाली गेला असून परिसरातील वाहतुकीवर परिणाम झाला आहे. प्रशासनाने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय प्रवास टाळण्याचे आवाहन केले असून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवले जात आहे.

पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे धरणांच्या पाणी पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. यामुळे खडकवासला, निरा देवघर, भामा आसखेड आणि पानशेत या चार प्रमुख धरणांतून मोठ्या प्रमाणात पाणी नदीपात्रात सोडण्यात येत आहे. नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून, प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

जळगाव जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे चाळीसगाव येथील १०० वर्षांहून अधिक जुन्या नगरपालिकेच्या इमारतीचा काही भाग कोसळला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. संबंधित इमारतीत प्रशासकीय कामकाज होत नसून स्वच्छता व पालिकेचे साहित्य ठेवण्यासाठी तिचा वापर केला जात असल्याने मोठी दुर्घटना टळली.

पुण्यातील खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवून ४५ हजार क्युसेकपर्यंत सोडण्याची तयारी करण्यात आली आहे. त्यामुळे नदीकाठच्या परिसरातील नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन खडकवासला पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी केले आहे. प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित राहण्याचे आणि नदीपात्रात जाणे टाळण्याचे आवाहन केले आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा तालुक्यातील दहेली येथे अडान नदीवरील पुलावरून जात असताना पुराच्या प्रवाहात इर्टिगा कार वाहून गेल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेत एका महिलेसह दोन मुली बेपत्ता झाल्या असून, पतीने झाडाचा आधार घेत थरारक बचाव केला. प्रशासनाकडून युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू आहे.

हिंगोली जिल्ह्यात मागील २४ तासात झालेल्या धुवाधार पावसामुळे नदी, नाल्यांना पूर आला असून कयाधू नदीच्या पुरामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. जिल्ह्यात मागील चोविस तासात ३० पैकी तब्बल २७ मंडळात अतिवृष्टी झाली आहे. सेनगाव तालुक्यातील रामप्रसादनगर भागात पुराच्या पाण्यात कार वाहून गेली. मात्र सुदैवाने कार मधील चौघेही बालंबाल बचावले आहे.

हिंगोली शहरालगत कयाधू नदी पात्राचे खोलीकरण झाल्यामुळे मागील चोविस तासात झालेल्या मुसळधार पावसातही परिसरातील पुराचा धोका कमी झाल्याने नागरीकांना काही प्रमाणात का होईना दिलासा मिळाला आहे. या शिवाय नदीच्या पात्रात पाणी साठवणुकीत वाढ झाल्याचे चित्र आहे.



हिंगोली शहरालगत कयाधू नदी वाहते. या नदीचे पात्र उथळ असल्याने पडलेला पाऊस वाहून जातो या शिवाय खोलीकरणा अभावी अरुंद झालेल्या पात्रामुळे मोठ्या पावसात नदीला पुर आल्यानंतर पुराचे पाणी परिसरातील वसाहतीमध्ये शिरल्याने मोठे नुकसान होत होते. शिवाय पावसाचे पाणी साठवणुकीसाठी उपाय योजना नसल्याने ऑक्टोबर अखेरपासूनच नदीचे पात्र कोरडेठाक पडू लागले होते.

नांदेड जिल्ह्यात दोन दिवसांपासून सलगपावसामुळे पैनगंगा नदीसह परिसरातील सर्वचनदी-नाले दुथडी भरून वाहत आहेत. पुरामुळेपांगरपहाड, आंदबोरी, रेवानाईक तांडा आणिअप्पारावपेठ या गावांचा मुख्य रस्त्यांशी संपर्कपूर्णपणे तुटला आहे. शेतात व पिकांमध्ये पाणीसाचल्याने मोठ्या प्रमाणावर नुकसानहोण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.प्रशासनाने पूरग्रस्त भागातील नागरिकांनासुरक्षित स्थळी हलवण्याची तयारी सुरू केलीआहे. तसेच ३० जुलै रोजी छत्रपतीसंभाजीनगर, बीड, जालना, हिंगोली,परभणी, लातूर व धाराशिव जिल्ह्यांत देखीलपावसाने हजेरी लावली.

वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यात गुरुवारी रात्री एक अंगावर काटा आणणारी थरारक घटना घडली. अल्लीपूर-टाकली मार्गावरील यशोदा नदीला आलेल्या पुरात अक्षय माटे नावाचा तरुण अचानक पाण्याच्या वेगात वाहून गेला. पुराच्या प्रचंड वेगामुळे तो तब्बल १५० ते २०० मीटर अंतरापर्यंत वाहून गेला, मात्र प्रसंगावधान राखत त्याने एका मोठ्या झाडाला घट्ट पकडले आणि त्यावर चढून स्वतःचे प्राण वाचवले. या घटनेची माहिती मिळताच महसूल विभाग, स्थानिक प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन पथकांनी रात्रभर घटनास्थळी ठाण मांडून परिस्थिती नियंत्रणात ठेवली. अखेर, आज पहाटे ४ वाजताच्या सुमारास बचाव पथकाने अत्यंत नियोजनबद्ध आणि धाडसी मोहीम राबवत या तरुणाला पुरातून सुखरूप बाहेर काढले आहे.

## भिवंडीत पत्त्यांसारखी चार मजली इमारत कोसळली; ८ जणांचा मृत्यू



मुंबई दि.३१ (प्रतिनिधी)- भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील बालाजी नगर-गंगारामवाडी येथील कोहिनूर अपार्टमेंट ही तळ अधिक चार मजली अतिधोकादायक ठरवलेली इमारत गुरुवारी रात्री साडेअकरा वाजताच्या सुमारास पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळली. सदर घटनेत आतापर्यंत ८ जणांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान घटनेची माहिती मिळताच पालिका आपत्कालीन कक्ष अग्निशामक दलाचे जवान घटनास्थळी धावून आले. परंतु इमारतीपर्यंत पोहोचण्यासाठी अरुंद रस्ता असल्या कारणाने बचाव सुरू करण्यात अडथळे येत होते. त्यानंतर रात्री एक वाजता घटनास्थळी एनडीआरएफचे पथक व टीडीआरएफ दाखल झाले. इमारतीच्या सुरुवातीला असलेली एक जुनी चाळ जेसीबीच्या सहाय्याने तोडून काढल्यानंतर दुर्घटग्रस्त इमारतीपर्यंत यंत्रणा पोहोचली. त्यानंतर बचाव कार्य करण्यासाठी सुरुवात केली आहे.

कोहिनूर अपार्टमेंट ही २००७ मध्ये असिसमेंट असून २०१२ मध्ये ही इमारत बनवण्यात आली असून या इमारतीमध्ये दोन अपार्टमेंट होते. परंतु कमकुवत काम असल्याने सुरवातीपासूनच इमारत धोकादायक झाल्याने पालिकेने ही इमारत धोकादायक घोषित केली होती. तर या इमारतीच्या एका विंगच्या तळमजल्यावर काही पिलर नादुरुस्त झाल्याने त्याची दुरुस्ती केली जात असल्याने सायंकाळी सहा वाजतापासूनच इमारतीला तडे जाण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे रात्री आठ वाजता इमारत झुकत असल्याने पालिका प्रभाग समिती क्रमांक चारचे सहाय्यक आयुक्त अरविंद घोगरे यांनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल होत इमारत खाली करण्यात येत होती. परंतु तळमजल्यावरील दुरुस्ती काम सुरू राहिल्याने व काही कुटुंबातील व्यक्ती साहित्य घेण्यासाठी इमारतीमध्ये असल्याने दुर्घटना घडल्यानंतर या इमारतीच्या ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सदर इमारत पालिकेने धोकादायक ठरविल्याने इमारतीला नोटीस लावण्यात आली होती. परंतु तळमजल्यावर सुरू असलेल्या दुरुस्ती कामामुळे ही दुर्घटना घडली असून यामध्ये पाच ते सहा जण अडकल्याची भीती असून घटनास्थळी एनडीआरएफ अग्निशामक दल, टीडीआरएफचे पथक मदतकार्य करीत असल्याची माहिती आमदार महेश चौघुले यांनी दिली आहे.

भीषण दुर्घटनेची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. या दुर्घटनेच्या चौकशीचे आदेश देत दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी महापालिका प्रशासनाला दिले आहेत. मुख्यमंत्र्यांनी स्वतः सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स (ट्विटर) वर पोस्ट करत यासंदर्भात माहिती दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी एक्सवरती पोस्ट करताना म्हटलं की, "भिवंडीत एक इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत काही लोकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. या प्रकरणात तत्काळ गुन्हा दाखल करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, असे आदेश महापालिका आयुक्तांना देण्यात आले आहेत. जखमींवर उपचार केले जात आहेत. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

## कर्जमाफीमुळे नमो शेतकरी महासन्मान निधीलाच कात्री; काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांचा आरोप

मुंबई दि.३१ (प्रतिनिधी)- राज्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना आता नमो शेतकरी महासन्मान निधी मिळणे बंद झाले आहे. खात्यामध्ये योजनेचा निधी जमा न झाल्याने सुमारे ५६ लाख शेतकरी चक्रावून गेलेत. कर्जमाफीच्या नावाखाली एका हाताने दिल्याचा गाजावाजा केला. आता दुसऱ्या हाताने शेतकऱ्यांचा हक्काचा निधी काढून घेण्याचा हा प्रकार म्हणजे शेतकऱ्यांची सरळ फसवणूक आहे, असा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. यामुळे आधीच गाजत असलेला कर्जमाफीचा मुद्दा अधिक तापण्याची चिन्हे आहेत.

केंद्र सरकारच्या पीएम किसान योजनेच्या धर्तीवर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १५ जून २०२३ रोजी ही योजना सुरू केली होती. याद्वारे पीएम किसानचे लाभार्थी असणाऱ्या राज्यातील शेतकऱ्यांना एका वर्षात प्रत्येकी दोन हजार रुपयांचे तीन हप्ते, म्हणजेच वर्षाला सहा हजार रुपये अतिरिक्त देण्याचे ठरले होते.

सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफी जाहीर केल्यावर, या कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेणारे सुमारे ५६ लाख शेतकरी नमो शेतकरी योजनेतून एका वर्षासाठी वगळले जाणार आहेत. सोप्या शब्दांत सांगायचे तर, ही योजना गुंडाळली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कर्जमुक्तीमुळे शासनावर आलेला आर्थिक भार हलका करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे बोलले जात आहे. ही शेतकऱ्यांची फसवणूक असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

## सहकार मंत्र्यांच्याच जिल्ह्यात सावकारांचा सुळसुळाट, पण खात्याला माहितीच नाही!; बच्चू कडूंचा सरकारवर हल्लाबोल

लातूर दि.३१ (प्रतिनिधी)- "अवैध सावकारकी आणि मायक्रो फायनान्स कंपन्यांनी गोरगरीब व शेतकऱ्यांची अक्षरशः लूट चालवली आहे. अनेक जण जामीनदार झाले म्हणून कोट्यवधींच्या जमिनी सावकारांनी बळकावल्या आहेत. हा प्रकार एकाच जिल्ह्यात नव्हे, तर राज्याच्या सहकार मंत्र्यांच्या जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणावर सुरू असूनही खात्याला किंवा मंत्र्यांना याची साधी माहितीच नाही, हे अत्यंत दुर्दैवी आहे," असा जोरदार हल ्बोल शिवसेना आमदार बच्चू कडू यांनी केला आहे. खासगी सावकारी प्रकरणाची पाहणी केल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना महसूल व पोलीस प्रशासनाला आणि सहकार मंत्र्यांना थेट इशारा दिला.

बच्चू कडू यांनी सहकार विभागाच्या निष्क्रियतेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. "मी विधान परिषदेत खाजगी सावकारी आणि मायक्रो फायनान्सच्या लुटीचा मुद्दा मांडल्यानंतर सहकार मंत्र्यांनी तातडीने बैठक घेऊन माहिती घेणे अपेक्षित होते. जेव्हा मी राज्यमंत्री होतो, तेव्हा सभागृहात मुद्दा आल्यास लगेच पाठपुरावा करायचो. पण आमदार बोलूनही जर खात्याचे मंत्री काहीच करत नसतील, तर पाणी कुठे मुरतंय हे पाहावं लागेल." "सहकार मंत्र्यांनी जिल्हावार किती सावकारी प्रकरणे दाखल झाली, किती शेतकऱ्यांच्या जमिनी परत मिळाल्या आणि किती जणांवर पोलीस कारवाई झाली, याचा साधा आढावाही घेतलेला नाही. कायद्यात उणिवा नाहीत, पण पैशांच्या ताकदीपुढे अधिकारी दबतात. प्रशासन जर दुर्लक्ष करत असेल, तर त्यांना वठणीवर आणल्याशिवाय आम्ही राहणार नाही," असा दम त्यांनी दिला. राज्यातील कर्जमाफी आणि आधार प्रमाणीकरणातील अडचणींवर बोलताना त्यांनी शेतकऱ्यांमधील एक मोठा संभ्रम दूर केला. "राष्ट्रीयकृत बँकांच्या यादीत फक्त मुद्दलाची रक्कम दिसत असून व्याजाची रक्कम दिसत नाही, तर जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या यादीत पूर्ण रक्कम दिसत आहे. यामुळे शेतकऱ्यांनी गैरसमज करून घेऊ नये. राष्ट्रीयकृत बँकांना हेअर कट लावण्यात आल्याने व्याज बँक माफ करणार आहे आणि मुद्दल सरकार भरणार आहे. जिल्हा बँका आधीच अडचणीत असल्याने सरकारने त्यांना पूर्ण रकमेची हमी दिली आहे." आधार प्रमाणीकरणात नेटवर्कच्या अडचणी येत असल्याने शेतकऱ्यांना त्रास होत आहे, यावर पर्यायी मार्ग काढून सर्व शेतकऱ्यांना लाभ दिला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## मंत्रालयाच्या कँटीनमधील फोटो पाहताच उच्च न्यायालयाने एफडीएला खडसावले

मुंबई दि.३१ (प्रतिनिधी)- मंत्रालयातील उपहारगृह ९८ टक्के स्वच्छ असल्याचा दावा करणाऱ्या अन्न व औषध प्रशासनाला मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी चांगलेच धारेवर धरले. न्यायालयाच्या आदेशानुसार वकिलांच्या पथकाने केलेल्या प्रत्यक्ष तपासणीत उपहारगृहात माश्या, अस्वच्छता, उघड्या ड्रेनेज जाळ्या, घाणेरडा फ्रीज आणि इतर अनेक त्रुटी आढळून आल्याने एफडीएच्या तपासणी अहवालावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सुनावणीदरम्यान न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, कायद्यापुढे सर्व समान आहेत. केवळ खासगी आस्थापनांवर कारवाई करून सरकारी उपहारगृहांना वेगळी वागणूक देता येणार नाही.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वकिलांच्या पथकाने मंत्रालयातील उपहारगृहाची प्रत्यक्ष पाहणी केली. या तपासणीत अनेक गंभीर त्रुटी समोर आल्या. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, उपहारगृहात माश्या आढळल्या. तसेच पाण्याच्या ड्रेनेजच्या जाळ्या उघड्या असल्याचे, फ्रीजमध्ये अस्वच्छता असल्याचे आणि बेसिन परिसरही घाण असल्याचे तपासणी अहवालात नमूद करण्यात आले. तपासणीदरम्यान जमिनीवर साचलेले घाणेरडे पाणी, गळणारे नळ आणि फ्रीजमधील डिफ्रॉस्ट अत्यंत अस्वच्छ अवस्थेत असल्याचेही वकिलांनी न्यायालयात सांगितले.

## इथेनॉलमिश्रित पेट्रोलमुळं २ ते ६ टक्क्यांपर्यंत मायलेज घटणार, इंजिनमध्ये बदलाची गरज नाही, नितीन गडकरींचं राज्यसभेत लेखी उत्तर

नवी दिल्ली दि.३१ (वृत्तसंस्था)- २० टक्के इथेनॉल मिश्रित पेट्रोल वापरल्यास वाहनाच्या प्रकार आणि वयानुसार इंधन कार्यक्षमता (मायलेज) २ ते ६ टक्क्यांनी कमी होऊ शकते, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी लोकसभेत दिली. मात्र, ई-२० इंधनामुळे इंजिनमध्ये कोणतेही बिघाड होत असल्याचे चाचण्यांमध्ये आढळले नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

ई-२० इंधनामुळे इ-१० पेट्रोलच्या तुलनेत वाहनाला अधिक चांगला वेग, सुधारित ड्रायव्हिंग अनुभव आणि सुमारे ३० टक्के कमी कार्बन उत्सर्जन मिळते, असे त्यांनी एका लेखी उत्तरात सांगितले.

ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया, सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स आणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशन यांनी संयुक्तपणे दुचाकी व चारचाकी वाहनांवर इथेनॉलमिश्रीत पेट्रोलचा परिणाम अभ्यासला.

देशभरात२० कोटींहून अधिक दुचाकी आणि ३ कोटींहून अधिक पेट्रोल कार इथेनॉलमिश्रित इंधनावर चालत असून यामुळे इंजिन निकामी झाल्याचा किंवा वाहन बंद पडल्याचा कोणताही अधिकृत पुरावा उपलब्ध नसल्याचे गडकरी यांनी सांगितले.तसेच, या पेट्रोलमुळे गंज, झीज किंवा वाहनाच्या आयुष्यात घट झाल्याचे कोणताही निष्कर्ष उपलब्ध नाही असा निष्कर्ष उपलब्ध झालेला नाही, असे त्यांनी नमूद केले.

बीएस-३ मानक गाड्यांमध्ये ई-२० पेट्रोल (२० टक्के इथेनॉल मिश्रित) वापरल्यास काही रबर पार्ट्स व गॅस्केट बदलावे लागू शकतात, असे गडकरी यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात राज्यसभेत मान्य केले. मात्र यामुळे इंजिनमध्ये बदल करण्याची गरज पडणार नसून हे पार्ट्स सर्व्हिसिंग दरम्यान सहज बदलता येतात, असेही सरकारने नमूद केले.

## मनोज जरांगे यांची भेट घेऊन त्यांचे समाधान करू; राधाकृष्ण विखे यांची भूमिका

राहाता दि.३१ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने जेवढे निर्णय घेतले, असे यापूर्वी कोणत्याही मुख्यमंत्र्यांनी घेतले नाहीत. महायुती सरकार मराठा समाजाच्या सर्व मागण्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे करीत असून, मनोज जरांगे पाटील यांच्यावर आंदोलनाची वेळ येऊ देणार नाही. वेळ पडली तर, त्यांची भेट घेऊन समाधान करेल, असे जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे यांनी सांगितले.

मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून पुन्हा आंदोलनाचा इशारा दिला, या पार्श्वभूमीवर, आज, शुक्रवारी लोणी येथे माध्यमांशी बोलताना मंत्री विखे म्हणाले, अंतरवाली सराटीत मनोज जरांगे यांना दिलेल्या आश्वासनानंतर राज्यात प्रथमच स्वतंत्र मराठा आरक्षण कक्ष स्थापण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मराठा विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीयांप्रमाणे शैक्षणिक सवलती व सोयीसुविधा देण्याची अंमलबजावणी सुरू केली आहे.

## नाशकातील खड्ड्यांवरून भुजबळांचा अधिकाऱ्यांवर हल्लाबोल

नाशिक दि.३१ (प्रतिनिधी)- कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात खोदकामांमुळे निर्माण झालेल्या धोकादायक स्थितीवरून राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी ही बाब निषेधार्ह असल्याचे सांगत प्रशासकीय यंत्रणांवर कठोर शब्दांत ताशेरे ओढले. खड्डेमय नाशिकची जबाबदारी अधिकाऱ्यांना टाळता येणार नाही. मोठे अधिकारी केवळ कार्यालयात बसण्यासाठी नसतात. ठेके दिले आणि मोकळे झाले, असे चालणार नाही. महापालिका आयुक्त आणि कुंभमेळा आयुक्त यांच्याकडे सर्व कार्यकारी अधिकार आहेत. कारवाई करणारे अधिकारीच डोळेझाक करीत असतील, तर दोषींवर कारवाई कशी होईल, असा प्रश्न उपस्थित करीत भुजबळ यांनी नाकर्त्या अधिकाऱ्यांवर कारवाईची आवश्यकता मांडली.

पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी २८ प्रमुख रस्त्यांची कामे एकाचवेळी सुरू करण्यात आली. तसेच पाणीपुरवठा, गटार, गॅस वाहिनी आदी कामांसाठी सर्वत्र खोदकाम करण्यात आले. मुसळधार पावसात खोदलेले रस्ते, सर्वत्र खड्डे आणि चिखलमय स्थितीमुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली. लहान-मोठे अपघात घडत असून काहींना प्राण गमवावे लागले, तर अनेकजण जायबंदी झाले. मंत्री भुजबळ यांनी या मृत्यूंसाठी महापालिका आणि शासनाला जबाबदार धरले.

नाशिकमध्ये जे सुरू आहे, ते निषेधार्ह असून असंतोषाचा उद्रेक होण्याची वाट पाहू नये, असे ते म्हणाले. मनपा आयुक्त मनीषा खत्री आणि कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांचा नामोल्लेख न करता त्यांनी उभयतांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन आणि नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी या विषयात लक्ष घालावे, अशी सूचना त्यांनी केली. डॉ. गेडाम हे उत्कृष्ट अधिकारी असून नाशिकच्या रस्त्यांवर फिरून काय चालले आहे, ते त्यांनी पाहायला हवे. इतर अधिकाऱ्यांवर सर्व काही सोडून ते थांबले, तर ते त्यांचेही अपयश मानले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

## भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावालांचा तडकाफडकी राजीनामा; सोशल मीडियावरून भाजप शब्द हटवला

नवी दिल्ली दि.३१ (वृत्तसंस्था)- शुक्रवार सकाळपासून राष्ट्रीय राजकारणात एका अनपेक्षित आणि खळबळजनक घडामोडीची जोरदार चर्चा रंगताना दिसत आहे. भारतीय जनता पक्षाची बाजू विविध माध्यमांवर आक्रमकपणे मांडण्यासाठी ओळखले जाणारे पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. पूनावाला यांनी गुरुवारी संध्याकाळी पक्षश्रेष्ठींकडे आपला राजीनामा सादर केल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. मात्र, त्यांच्या या तडकाफडकी राजीनाम्याचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे.

राजीनाम्याच्या वृत्तानंतर शहजाद पूनावाला यांनी आपल्या एक्स हँडल्सवरील प्रोफाईल बायोमध्ये तातडीने बदल केले आहेत. त्यांनी आपल्या बायोमधून भाजप हा शब्द पूर्णपणे हटवला आहे. नवीन बायोमध्ये त्यांनी स्वतःची ओळख भारतीय आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आजीवन अनुयायी अशी करून दिली आहे.

## राम मंदिरातील लुटीवरून संसदेच्या दारात विरोधकांचे अभिनव आंदोलन

नवी दिल्ली दि.३१ (वृत्तसंस्था)- राम मंदिरातील प्रसादाच्या चोरीच्या निषेधार्थ शुक्रवारी संसद परिसरात विरोधी पक्षाच्या खासदारांनी आंदोलन केले. खासदार पप्पू यादव पुजाऱ्याच्या वेशात आले आणि त्यांनी दानपेटी आणली होती. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह विरोधी पक्षाच्या खासदारांनी दानपेटीत देणगी जमा केली. यानंतर प्रतिकात्मक पद्धतीने पप्पू यादव यांनी दानपेटी घेत पळून जाण्याचा प्रयत्न केला. यानंतर त्यांना खासदारांनी पकडले. त्यांनी अमित शाह संसदेतून का गायब? असे लिहिलेले फलकही हातात घेतले होते. दरम्यान, लोकसभेचे कामकाज सकाळी ११ वाजता सुरू झाले, परंतु विरोधी पक्षांच्या गदारोळामुळे ते दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. दुपारी १२ वाजता कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर, लोकसभेने जन्म आणि मृत्यू नोंदणी (सुधारणा) विधेयक, २०२६ आवाजी मतदानाने मंजूर केले. लोकसभा आणि राज्यसभा यांचे कामकाज ३ ऑगस्टपर्यंत तहकूब करण्यात आले आहे. दरम्यान, काँग्रेसने केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांच्या संसदेतील वक्तव्याविरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव मांडला आहे. जंतर मंतर आणि संसद मोर्चादरम्यान आंदोलकांवर गोळीबार झाला नसल्याचे सिंह यांनी म्हटले होते.

केंद्रीय मंत्री नित्यानंद राय यांनी लोकसभेत जन्म आणि मृत्यू नोंदणी (सुधारणा) विधेयक, २०२६ मंजूर करण्याचा प्रस्ताव मांडला. हे विधेयक आवाजी मतदानाने मंजूर झाले. त्यानंतर, विरोधी पक्षांच्या गदारोळामुळे लोकसभेचे कामकाज ३ ऑगस्टपर्यंत तहकूब करण्यात आले.

किरेन रिजिजू म्हणाले, "भविष्यात असे घडणे थांबावे अशी आमची इच्छा आहे. तुम्ही चर्चेत सहभागी होऊन मग बाहेर जाऊन सरकार चर्चेला परवानगी देत नाही असे म्हणू नका. जर पुढचे विधेयक मांडले गेले आणि तुम्ही गोंधळ घातला, तर ते चांगले होणार नाही. चर्चा करा, गोंधळ घालू नका असे ते म्हणाले.

## अधिकारी अंकित शर्मा हत्या प्रकरणात ताहीर हुसेनला जन्मठेप

नवी दिल्ली दि.३१ (वृत्तसंस्था)- गुप्तचर अधिकाऱ्याच्या हत्येप्रकरणी आम आदमी पार्टीच्या माजी नगरसेवक ताहीर हुसेनला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. फेब्रुवारी २०२० मध्ये दिल्ली दंगलीदरम्यान गुप्तचर अधिकारी अंकित शर्मा यांच्या हत्येप्रकरणी हुसेनला न्यायालयाने दोषी ठरवले आहे. दिल्लीच्या करकरडूमा न्यायालयाने शिक्षा सुनावताना, "गुन्ह्याची पद्धत अत्यंत क्रूर होती," असे म्हटले आहे.

शिक्षा सुनावताना न्यायालयाने हा गुन्हा अत्यंत गंभीर असल्याचे नमूद केले. तसेच, या घटनेमुळे समाजाला देखील धक्का बसला आहे. हत्येचा हा गंभीर प्रकार आणि त्यानंतर ज्या पद्धतीने हा सगळा प्रकार उघडकीस आला त्यामुळे आता समाजास देखील आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे, असे अतिरिक्त सत्र न्यायाधीश प्रवीण सिंह म्हणाले. "मृतदेहाला जनावरासारखे फरफटत नेऊन गटारात फेकून देण्यात आले होते," असे न्यायाधीश म्हणाले. गुन्ह्याचा प्रकार अत्यंत क्रूर असल्याचे स्पष्ट करताना यातील सर्व दोषींना न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

# भारतीय असंतोषाचे जनक

लोकमान्य म्हणजे लोकांनी मान्यता दिलेलं एक प्रखर व परखड असं जहालमतवादी व्यक्तिमत्त्व. ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मिळविणारंच,'' असं इंग्रज सरकारला ठणकावून सांगण्याचे धारिष्ट्य कोणी दाखविले, तर ते लोकमान्य टिळकांनी, लोकशिक्षण व जनजागृती करण्यासाठी त्यांनी गणेशोत्सव व शिवजयंती हे उत्सव सार्वजनिकरित्या साजरी करण्याची प्रथा सुरू केली. व्यापक जनआंदोलन हाच स्वातंत्र्यप्राप्तीचा खरा मार्ग आहे, हे लोकांच्या मनात बिंबवून टिळकांनी जनमानसाला सह-अस्तित्वाची जाणीव करून दिली.

स्वातंत्र्य लढ्याच्या धुमश्चक्रीत लोकांच्या हृदयात स्वराज्याची मशाल पेटवून इंग्रजांच्या जुलमी राजवटीला सुरूंग लावणारे जहाल नेतृत्व म्हणून लोकमान्य टिळकांची जनमनसात आजही ओळख आहे. भारतीयांना गोऱ्यांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी समाजसुधारक आगरकर यांच्या मदतीने केसरी व मराठा या वृत्तपत्र आयुधांचा अचूक प्रयोग करून इंग्रज सत्तेविरूद्ध जनमत उभं केलं. वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकांना विदेशी मालावर बहिष्कार टाकण्यास प्रवृत्त करून स्वदेशीचा अंगीकार करण्याची शिकवण दिली. लोकांमध्ये क्रांतीची तीव्र भावना निर्माण करून टिळकांनी त्यांच्या मनात ब्रिटिशांविरूद्ध असंतोष निर्माण केला. त्यामुळेच त्यांना असंतोषाचे जनक म्हटलं जातं. राष्टीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांनी चांगली कामगिरी बजावली. देशबांधवांना आपल्या हक्कांची जाणीव करून देऊन त्यांच्या मनात अन्यायांविरूद्ध चीड निर्माण करण्याचं काम टिळकांनी आपल्या लेखणीतून केले. त्यातूनच त्यांची निर्भिडवृत्ती व रोखठोक भूमिकेची साऱ्या भारतीयांना ओळख झाली.

ब्रिटिश राजवटीविरोधी उभारलेल्या या चळवळीला यशस्वी करण्यात टिळकांसह गोपाळ गणेश आगरकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळ कृष्ण गोखले, न्या. महादेव रानडे, चाफेकर बंधू, लाला लजपतरा, बिपीनचंद्र पाल, रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांदी अशा अनेक दिग्गजांनी मोलाचं योगदान दिले. टिळकांनी 'स्वराज्य, स्वदेशी व विदेशीचा बहिष्कार' या त्रिसुत्रांचे महत्त्व लोकांच्या मनात बिंबवलं आणि त्यातूनच जनआंदोलनाची उभारणी केली. ते आपल्या वृत्तपत्राच्या वापरासाठी स्वदेशी कागदाचा वापर करण्यावर भर देत असत. १९०८ मध्ये जनतेच्या भावना भडकविण्याच्या राजद्रोहाच्या आरोपाखाली इंग्रज सरकारने टिळकांना मंडाले तुरूंगात सहा वर्षाची काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावली. परंतु कैद्यासारखे न जगता त्यांनी तेथे गीता रहस्य हा ग्रंथ लिहिला.

ब्रिटीश राजसत्तेविरूद्ध पुकारलेल्या संघर्षात सर्व जातीधर्मातील लोकांना सामील करून त्यांच्यात एकात्मता, बंधुभाव व देशप्रेमाची जाज्वल्य भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने तसेच 'राष्ट्रातील महापुरूषांचे स्मरण हे राष्ट्रीयत्व कायम राखण्याचे एक चांगले साधन आहे' या विचाराच्या आधारावर टिळकांनी गणेशोत्सव व शिवजयंती हे उत्सव सार्वजनिकरित्या साजरे करण्याची प्रथा सुरू केली.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रायगडावरील समाधीच्या जिर्णोद्धारासाठी टिळकांनी १८९५ मध्ये जनआंदोलन केले आणि ते यशस्वी होऊन पहिला शिवजयंती उत्सव १५ एप्रिल, १९८६ रोजी रायगडावर मोठ्या थाटामाटात साजरा झाला. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापनेसाठी केलेल्या शौर्याची लोकांना माहिती व्हावी, यासाठी टिळकांनी शिवजयंती उत्सव केवळ पुण्यातच नव्हे, तर राज्यभर साजरा करण्यास चालना दिली. पुणे शहरात १८८७ मध्ये प्लेगच्या साथीने हाहा:कार माजला असताना टिळकांनी लोकांना धीर दिला आणि सर्वप्रकारच्या वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देऊन हजारो लोकांचे प्राण वाचविले. इंग्रज प्रशासनाने या घटनेकडे बुद्धीपुरस्सर दुर्लक्ष करून जनतेला वेठीस धरण्याचा अमानुष प्रयत्न केला. इंग्रजांच्या या अमानवीय व भ्याडकृत्याचा टिळकांनी धिक्कार करून मराठा व केसरीतून तीव्र शब्दांत निषेध नोंदविला. इंग्रज प्रशासनाच्या मदतीला भीक न घालता टिळकांनी स्वत:च्या हिमतीवर प्लेगग्रस्तांना मदतीचा हात देऊन एक सच्चा समाजसेवक म्हणून त्यांनी आपली भूमिका समर्थपणे बजावली. १८९६ मध्ये देशव्यापी दुष्काळाचे सावट पसरले होते. दुष्काळग्रस्तांना इंग्रज प्रशासनाने सर्वप्रकारची मदत करावी, अशी आग्रही मागणी टिळकांनी केली होती. 'मुकाट्याने जगण्याचे हे दिवस नव्हेत' या मथळ्याखाली मराठी-केसरीमध्ये लेख लिहून त्यांनी लोकांना आपल्या हक्कांची जाणीव करून दिली. खऱ्या अर्थाने टिळकांनी पारतंत्र्य काळात सर्व वर्गातील लोकांमध्ये गोऱ्यांविरूद्ध विद्रोहाची भावना निर्माण केली. ते सच्चे व कट्टर देशभक्त होते. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, कारण त्याशिवाय मानवाचा बौद्धिक, सामाजिक व वैचारिक विकास होऊ शकत नाही. ही गोष्ट त्यांनी जनतेच्या मनात बिंबवली. ''न्यायाची चाड व अन्यायाची चिड हे शिक्षण घेतल्यावरच कळते'' असा मोलाचा उपदेश त्यांनी जनतेला केला. टिळक स्वत:पुण्याच्या डेक्कन कॉलेजचे पदवीधर होते. त्यानंतर १८८२ मध्ये त्यांनी मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजमधून कायद्याची पदवी संपादन केली.


टिळकांनी शिक्षणावर विशेष भर दिला. जनसामान्यांसाठी शिक्षणाची सोय व्हावी, यासाठी त्यांनी डेक्कन एज्युकेशन संस्थेची स्थापना केली. तसेच पुण्यात न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. समाजाचा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक पाया मजबूत होण्यासाठी शिक्षणाची नितांत गरज आहे, हे जाणून टिळकांनी आपल्या वृत्तपत्राव्दारे लोकशिक्षणाचाही प्रभावीरित्या प्रचार व प्रसार केला. 'बंगालची फाळणी' हा केवळ स्थानिक प्रश्न नसून, भारतीय अस्मितेवर घातलेला वज्राघात आहे, याची जाणीव टिळकांनी देशबांधवांना करून दिली. लाल-बाल-पाल या त्रयींनी ब्रिटीश प्रशासनाच्या दुष्ट मनसुब्यांचा पर्दाफाश करून या जुलमी सत्तेविरूद्ध जनतेच्या मनात असंतोष निर्माण केला. आपल्या मातृभूमीची तसेच देशबांधवांची ब्रिटीशांच्या गुलामगिरीतून मुक्तता व्हावी. यासाठी टिळकांनी जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत लढा दिला. टिळकांचे स्मरण झाले म्हणजे भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासातील एक पर्व, एक युग, एक अध्याय डोळ्यासमोर उभा राहतो. जाज्वल्य देशाभिमान व दुर्दम्य राष्ट्रप्रेमाचा प्रत्येक देशबांधवांनी अवलंब करावा, म्हणजे हिच टिळकांना खरी श्रद्धांजली ठरेल.

# राष्ट्राकरिता जीवन समर्पण करणारे लोकमान्य टिळक

**इंग्रजांचे** वर्चस्व असतांना भारतभूमीच्या उद्धारासाठी अहर्निश चिंता वहाणारी आणि तन, मन अनब धन उद्धारकार्यास अर्पण करणारी काही नररत्ने होऊन गेली. त्यांपैकी एक दैदिप्यमान रत्न म्हणजे बाळ गंगाधर टिळक. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' अशी गर्जना करणाऱ्या या 'भारताच्या नरसिंहाने' आपले ऐन तारुण्य स्वार्थत्यागपूर्वक राष्ट्राकरिता वाहून देशात नवजागृती निर्माण केली. 'लोकमान्य' पदवी प्राप्त झालेल्या ध्येयवादी आणि चिकाटी व्यक्तीमत्त्वाची १ ऑगस्ट या दिवशी पुण्यतिथी साजरी केली जाते. त्यानिमित्त कणखर आणि जाज्वल नेतृत्वाचा थोडक्यात परिचय करून घेऊ. त्यांच्या जीवनचरित्रातून आपल्याला नेहमीच बोध आणि मार्गदर्शन मिळत राहील.

१. वृत्तपत्रांची आवश्यकता जाणून 'केसरी' आणि 'मराठा' साप्ताहिक चालू करणे – शाळांमधून केवळ विद्यार्थ्यांनाच शिक्षण देता येत असे; परंतु आता प्रत्येक भारतीयास त्याच्या पारतंत्र्याचे स्वरूप समजावून सांगायचे होते. लोकांना संघटित करून वर्तमानस्थितीचे भान आणि कर्तव्याची जाण त्यांच्यात निर्माण करायची होती. 'आहे, हे सर्व प्रभावीरीत्या करायचे, तर वृत्तपत्रांचीच आवश्यकता आहे', असा विचार त्यांनी केला. त्यांनी 'केसरी' आणि 'मराठा' साप्ताहिक चालू केले. काही दिवसांतच ही साप्ताहिके लोकप्रिय झाली. यामध्ये जनतेच्या दुःखाचे सविस्तर विवेचन आणि वास्तविक घटनांचा स्पष्ट उल्लेख असायचा. आपल्या अधिकारांसाठी लढण्याकरिता भारतीयांना सिद्ध केले जात होते. त्यांच्या भाषेमध्ये एवढे सामर्थ्य होते की, भ्याड व्यक्तीच्या ठायीही स्वातंत्र्याची लालसा निर्माण व्हावी. केसरीने इंग्रज सरकारच्या कित्येक अन्यायकारी गोष्टी उजेडात आणल्या. त्यामुळे शासनाने 'केसरी'ला न्यायालयात खेचले आणि याचा परिणाम म्हणून टिळक अनब आगरकर यांना ४ मास सश्रम कारावासाची शिक्षा झाली. खिस्ताब्द १८९८ मध्ये वेळी गोखले, रानडे यांनी स्वदेशीचे आंदोलन छेडले होते. टिळकांनी आपल्या साप्ताहिकाद्वारे, लेखांच्या आधारे हा विचार घराघरात पोहोचवला.

२. गणेशोत्सव आणि शिवजन्मोत्सव या माध्यमांद्वारे लोकांना संघटित करणे – खिस्ताब्द १८९० ते १८९७ ही सात वर्षे त्यांच्या आयुष्यात फार महत्त्वाची ठरली. टिळक आता राजकारण धुरंधर बनले. सामाजिक सुधारणांसाठी तर त्यांनी शासनाविरुद्ध लढाईच चालू केली. बालविवाहाला प्रतिबंध आणि विधवाविवाहाला संमती मिळावी; म्हणून त्यांनी सर्वांना आवाहन केले. गणेशोत्सव आणि शिवजन्मोत्सव या माध्यमांद्वारे लोकांना संघटित केले. मध्यंतरी त्यांची मुंबई विद्यापिठाच्या 'फेलो' या पदावर निवड झाली होती. याच वेळी त्यांनी 'ओरायन' हा ग्रंथ लिहिला.



३. प्लेगची महामारी पसरल्याने रुग्णालये उघडणे – खिस्ताब्द १८९६ मध्ये भारतात मोठा दुष्काळ पडला, प्लेगची महामारी पसरली. त्यासाठी टिळकांनी रुग्णालये उघडली. स्वयंसेवकांच्या साहाय्याने रोग्यांची शुश्रुषा होऊ लागली. संपादकीय लेखातून दुष्काळ आणि महामारीत बळी पडलेल्या लोकांच्या संख्येचे आकडे निर्भयपणे प्रसिद्ध केले. शासनाकडून साहाय्य मागण्याचा आपला अधिकार असून त्यासंबंधी योग्य कार्यवाही व्हावी, यासाठी जनतेला सतर्क केले; पण शासन व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाच्या हीरकजयंती महोत्सवाची सिद्धता करण्यात गुंग होते. शेवटी महामारीवरच्या नियंत्रणासाठी रँड नावाच्या अधिकर्‍याची नियुक्ती झाली; पण रँड हा महामारीपेक्षाही भयानक ठरला. भारतीय जनतेवर अत्याचार करण्यात त्याने कुठेही कसूर ठेवली नाही. त्याच्या या अत्याचारामुळे एका युवकाने त्याला गोळी घालून ठार केले. 'या हत्येमागे टिळकांचा हात असावा', या संशयाने खिस्ताब्द १८९७ मध्ये त्यांना कारागृहात डांबले.

४. राष्ट्राकरिता जीवन समर्पण आणि 'गीतारहस्य' या ग्रंथाच्या लेखनाचे महान कार्य – स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण, हे पवित्र शब्द टिळकांनी लोकांना शिकवले. लोकांनी त्यांचा शस्त्रासारखा उपयोग केला. स्वदेशाविषयी प्रेम आणि पारतंत्र्याविषयी असंतोष निर्माण करण्याची क्रांती टिळकांनी केली. या सर्व कारवायांनी इंग्रज शासन चांगलेच चिडले आणि टिळकांवर खोटेनाटे आरोप लादून त्यांच्या हातात बेड्या ठोकल्या. न्यायालयात १४ वर्षेपर्यंत टिळक लढले. जनतेचा आवेश न्यून व्हावा; म्हणून शासनाने अत्यंत कठोर आणि निर्दय उपाय योजले. या दुष्ट कृत्यांमुळे टिळकांचे रक्त तापले आणि 'देशाचे दुर्भाग्य' या मथळ्याखाली त्यांनी केसरीमध्ये लेख लिहिला. त्यांनी लिहिले 'देशात बॉम्बची निर्मिती होणे, हे देशाचे दुर्दैव होय; परंतु ते सिद्ध करून फेकण्यासारखी परिस्थिती निर्माण करण्यास शासनच उत्तरदायी आहे.' त्यांच्या या जहाल लिखाणामुळे शासनाची पक्की निश्चिती झाली की, जोपर्यंत टिळक मोकळे आहेत, तोवर शासनाला धोका आहे. या लेखाविषयी देशद्रोहाचा आरोप लावून २४ जून १९०८ या दिवशी मुंबईला त्यांना पकडण्यात आले आणि ६ वर्षांची शिक्षा ठोठावली. या वेळी ते ५२ वर्षांचे होते. याच वेळी त्यांना मधुमेहाचा विकार जडला; परंतु त्यांनी पर्वा केली नाही. ब्रह्मदेशातील मंडालेच्या कारागृहात त्यांची रवानगी झाली. तेथे टिळकांची लहानशी लाकडी फळ्यांची खोली होती. सश्रम कारावासातून साधा कारावास अशी शिक्षेत घट करण्यात आली. त्यांना लेखन-वाचनाची सवलत मिळाली. इथेच त्यांनी 'गीतारहस्य' या ग्रंथाच्या लेखनाचे महान कार्य केले. एकान्त सुसह्य व्हावा; म्हणून ते सदैव लेखन आणि वाचन यांत दंग असत. ६ वर्षांचा कारावास समाप्त होईपर्यंत त्यांनी ४०० पुस्तकांचा संग्रह केला. 'स्वयंशिक्षक' मार्गदर्शिकांचा उपयोग करून त्यांनी जर्मन आणि प्रफेंच भाषेचे ज्ञान संपादन केले. वेळेअभावी जी कामे ते पूर्वी करू शकत नसत, त्याकडे ते आता लक्ष पुरवू लागले. सकाळी प्रार्थना, गायत्री मंत्र आणि अन्य वैदिक मंत्रांचा जप अनब अन्य धार्मिक कृत्ये ते करू लागले. ते मंडालेच्या कारावासात असतांनाच त्यांची पत्नी सत्यभामाबाई यांचा भारतात मृत्यू झाला. टिळकांचे जीवन दिव्य होते. लोकांच्या सन्मानाला आणि श्रद्धेला ते प्रत्येक दृष्टीने पात्र होते. तन, मन आणि धन सर्व अर्पण करून त्यांनी देशसेवा केली. शरीर थकलेले असतांनाही त्यांचा लोकजागृतीसाठी सतत प्रवास, व्याख्याने हा कार्यक्रम चालूच होता. जुलै १९२० मध्ये त्यांची प्रकृती आणखीनच खालावली आणि १ ऑगस्टच्या प्रथम प्रहरी त्यांचा जीवनदीप मालवला. ही दुःखद वार्ता वाऱ्यासारखी सर्व देशभर पसरली. आपल्या या प्रिय नेत्याच्या अंत्यदर्शनासाठी जनतेचा महासागर लोटला. आपल्या प्रत्येक कृतीतून जीवनाच्या अंतिम श्वासापर्यंत देशाकरिता लढत राहिलेल्या ध्येयवादी थोर राष्ट्रभक्ताला आमचे विनम्र अभिवादन

**– संकलक : कु. प्रियांका लोणे,**
मराठवाडा संघटक, हिंदु जनजागृती समिती
संपर्क क्र.: ८२०८४४३४०१

# अण्णाभाऊ साठे : लेखनाची प्रेरणा

समाजातील उपेक्षित, शोषित आणि वंचित घटकांच्या जीवनाला आपल्या सशक्त लेखणीतून शब्दबद्ध करणारे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे मराठी साहित्यातील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या साहित्याने केवळ मराठी साहित्य समृद्ध केले नाही, तर सामाजिक परिवर्तनाची चळवळही अधिक व्यापक केली. त्यांनी आयुष्यभर लेखणीला समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन मानले आणि साहित्याच्या माध्यमातून अन्याय, विषमता, गरिबी, शोषण आणि मानवी वेदना यांना वाचा फोडली. म्हणूनच त्यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण आणि नव्या पिढीमध्ये लेखनाची प्रेरणा जागविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १ ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिन 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमामागील मूलभूत हेतू म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने, प्रत्येक तरुणाने आणि प्रत्येक संवेदनशील नागरिकाने लेखनाच्या माध्यमातून समाजाशी नाते जोडावे, आपले विचार सुसंस्कृतपणे व्यक्त करावेत आणि मराठी साहित्यविश्व अधिक समृद्ध करावे हा आहे. शासन परिपत्रकातही स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक कार्याच्या स्मरणार्थ समाजातील सर्व स्तरांतील प्रतिभावंतांना लेखनाची प्रेरणा मिळावी आणि शैक्षणिक संस्थांमध्ये विविध साहित्यिक उपक्रम आयोजित व्हावेत.

१ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे जन्मलेल्या अण्णाभाऊ साठे यांचे बालपण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत गेले. त्यांना शालेय शिक्षण फारसे घेता आले नाही; परंतु जीवनाच्या कठीण अनुभवांनी त्यांना घडविले. परिस्थितीमुळे त्यांचे कुटुंब मुंबईत स्थलांतरित झाले. गिरणगावातील कष्टकरी जीवन, झोपडपट्ट्यांतील संघर्ष, कामगारांचे हाल, जातीय विषमता आणि सामाजिक अन्याय त्यांनी अत्यंत जवळून अनुभवला. याच अनुभवांनी त्यांच्या साहित्याला वास्तववादी स्वरूप प्राप्त झाले. त्यांनी पुस्तकांमधून जितके शिकले, त्याहून अधिक समाजातून शिकले. त्यामुळे त्यांचे साहित्य कृत्रिम न वाटता जिवंत जीवनाचा आरसा बनले. त्यांनी कधीही राजवाड्यांतील वैभवाची कथा लिहिली नाही; त्यांनी झोपडीतील माणसाचे अश्रू, घाम आणि संघर्ष यांनाच आपल्या साहित्याचा केंद्रबिंदू बनविले.

अण्णाभाऊ साठे हे लोकशाहीर म्हणून जितके लोकप्रिय होते तितकेच ते एक समर्थ कादंबरीकार, कथाकार, लोकनाट्यकार आणि सामाजिक विचारवंत होते. त्यांनी विविध साहित्यप्रकारांत विपुल लेखन केले. त्यांच्या साहित्यामध्ये श्रमिक, दलित, स्थलांतरित, शेतमजूर, स्त्रिया, कष्टकरी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या माणसांचे जीवन अत्यंत प्रभावीपणे चित्रित झाले आहे. त्यांनी साहित्याला केवळ सौंदर्याचा विषय न मानता समाजपरिवर्तनाचे प्रभावी शस्त्र बनविले. त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीत संघर्ष आहे, स्वाभिमान आहे, मानवी प्रतिष्ठेचा आग्रह आहे आणि समतेचा संदेश आहे.

त्यांच्या 'फकिरा' या कादंबरीने मराठी साहित्याला नवी दिशा दिली. अन्यायाविरुद्ध झुंज देणाऱ्या सामान्य माणसाच्या संघर्षाचे चित्रण करणारी ही कादंबरी आजही सामाजिक साहित्याचा मानदंड मानली जाते. त्याचप्रमाणे त्यांच्या असंख्य कथा, पोवाडे, लावण्या आणि लोकनाट्यांनी जनतेमध्ये सामाजिक जाणीव निर्माण केली. लोकभाषेतील सहजता, कथनातील ओघवतेपणा आणि वास्तववादी आशय यामुळे त्यांचे साहित्य सर्वसामान्यांच्या मनात घर करून राहिले. त्यांनी लोककलेला परिवर्तनाची दिशा दिली आणि शाहिरीला सामाजिक बांधिलकीचे स्वरूप प्राप्त करून दिले.

अण्णाभाऊ साठे यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही स्वतःच्या वैयक्तिक यशासाठी लेखन केले नाही. त्यांच्या लेखणीचा उद्देश समाजातील अन्याय उघड करणे, वंचितांच्या भावना व्यक्त करणे आणि सामान्य माणसाला आत्मविश्वास देणे हा होता. त्यांनी आपल्या साहित्यामधून स्वाभिमान, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा सातत्याने पुरस्कार केला. त्यांच्या मते लेखक हा समाजाचा जागरूक प्रहरी असतो. तो केवळ घटनांचे वर्णन करत नाही, तर समाजाला विचार करायला भाग पाडतो. त्यामुळे त्यांचे साहित्य आजही तितकेच समकालीन आणि प्रेरणादायी वाटते.

आजच्या डिजिटल युगात अभिव्यक्तीची अनेक माध्यमे उपलब्ध झाली आहेत. सामाजिक माध्यमे, संकेतस्थळे, ब्लॉग, ई-पुस्तके आणि विविध डिजिटल व्यासपीठांमुळे प्रत्येकाला आपले विचार मांडण्याची संधी मिळाली आहे. मात्र अभिव्यक्तीची ही संधी जबाबदारीने वापरणे तितकेच महत्त्वाचे आहे. माहितीचा वेग वाढला असला तरी विचारांची खोली कमी होत असल्याची खंत अनेक साहित्यिक व्यक्त करतात. अशा काळात अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य आपल्याला शिकवते की लेखन हे केवळ प्रसिद्धी मिळविण्याचे साधन नसून समाजाप्रती असलेल्या उत्तरदायित्वाची अभिव्यक्ती आहे. लेखकाने सत्याचा शोध घेतला पाहिजे, मानवी मूल्यांचा सन्मान केला पाहिजे आणि समाजातील सकारात्मक परिवर्तनासाठी लेखणीचा उपयोग केला पाहिजे.



याच व्यापक विचारातून महाराष्ट्र शासनाने 'लेखन प्रेरणा दिन' साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. शासन परिपत्रकानुसार विद्यापीठे, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये कविता, कथा, निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा, स्थानिक साहित्यिकांच्या मुलाखती व व्याख्याने, ग्रंथदिंडी, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन, त्यांच्या व्यक्तिमत्त्व व साहित्यावर व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा आणि साहित्य संमेलनांचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपक्रमांचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी, लेखनाची आवड आणि साहित्यिक संवेदनशीलता विकसित करणे हा आहे.

लेखन ही केवळ शब्दांची मांडणी नसते; ती विचारांची शिस्त, संवेदनशीलतेची अभिव्यक्ती आणि समाजाशी असलेल्या नात्याची जाणीव असते. जेव्हा एखादा विद्यार्थी कविता लिहितो, कथा रचतो, निबंध मांडतो किंवा एखाद्या सामाजिक विषयावर आपले मत व्यक्त करतो, तेव्हा तो केवळ लेखन करत नसतो; तो आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकासही करत असतो.

लेखनामुळे निरीक्षणशक्ती वाढते, चिकित्सक दृष्टी विकसित होते, भाषेवर प्रभुत्व मिळते आणि समाजातील विविध प्रश्नांकडे अधिक व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची क्षमता निर्माण होते. म्हणूनच 'लेखन प्रेरणा दिन' हा केवळ साहित्यिक कार्यक्रम नसून विचारक्षम, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडविण्याचा एक प्रभावी सामाजिक उपक्रम आहे.

आजच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल माध्यमे आणि सामाजिक माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे अभिव्यक्तीची साधने बदलली असली तरी प्रभावी लेखनाचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही. उलट माहितीच्या प्रचंड प्रवाहात सत्य, विवेक, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारी जपणारे लेखन अधिक आवश्यक बनले आहे. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या काळात लेखणीला परिवर्तनाचे शस्त्र बनविले; आजच्या पिढीने तीच लेखणी ज्ञान, विज्ञान, लोकशाही, संविधानिक मूल्ये आणि मानवी संवेदनशीलता यांची वाहक बनविण्याची गरज आहे. लेखन प्रेरणा दिनाचा खरा अर्थ केवळ लेखनस्पर्धा आयोजित करणे एवढाच नसून विद्यार्थ्यांमध्ये प्रश्न विचारण्याची वृत्ती, चिकित्सक विचारसरणी, कल्पकता आणि सामाजिक बांधिलकी विकसित करणे हा आहे.

लेखन ही एक सर्जनशील प्रक्रिया आहे. ती माणसाला स्वतःशी संवाद साधायला शिकवते. वाचनातून विचार जन्माला येतात आणि विचारांमधून लेखन घडते. त्यामुळे लेखन प्रेरणा दिन हा प्रत्यक्षात वाचन संस्कृतीलाही बळ देणारा उपक्रम आहे. ज्या समाजात वाचनाची सवय दृढ असते, त्या समाजात विचारांची देवाणघेवाण समृद्ध होते, मतभिन्नतेचा आदर वाढतो आणि लोकशाही अधिक मजबूत होते. अण्णाभाऊ साठे यांनी स्वतः औपचारिक शिक्षणाची मर्यादा असतानाही सातत्याने वाचन, निरीक्षण आणि अनुभव यांच्या बळावर स्वतःला घडविले. त्यामुळे त्यांचे जीवन प्रत्येक विद्यार्थ्याला एक महत्त्वाचा संदेश देते की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी जिद्द, जिज्ञासा आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या जोरावर मोठे साहित्य निर्माण करता येते.

आज शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये लेखन कौशल्य विकसित करण्यासाठी विविध उपक्रमांची आवश्यकता आहे. शासनाच्या परिपत्रकातही कविता, कथा, निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा, स्थानिक साहित्यिकांची व्याख्याने, ग्रंथदिंडी, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन, त्यांच्या व्यक्तिमत्त्व व साहित्यावर चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा आणि साहित्य संमेलनांचे आयोजन करण्यावर भर देण्यात आला आहे. हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देतात, भाषिक कौशल्य वाढवितात आणि साहित्याबद्दल आत्मीयता निर्माण करतात.

लेखनाची खरी प्रेरणा पुरस्कारातून नव्हे, तर समाजाशी असलेल्या नात्यातून निर्माण होते. जेव्हा लेखक समाजातील वेदना अनुभवतो, सामान्य माणसाच्या आशा-आकांक्षा समजून घेतो आणि त्या प्रामाणिकपणे शब्दबद्ध करतो, तेव्हा त्याचे साहित्य काळाच्या कसोटीवर टिकते. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य याच कारणामुळे आजही अभ्यासले जाते. त्यांनी कधीही कल्पनारम्य वैभवाचे चित्र रंगविले नाही; त्यांनी वास्तवाला शब्द दिले. त्यांच्या लेखनातील पात्रे ही संघर्ष करणारी, स्वाभिमान जपणारी आणि परिवर्तनाची स्वप्ने पाहणारी माणसे आहेत. त्यामुळे त्यांचे साहित्य केवळ एका समाजघटकाचे प्रतिनिधित्व करत नाही, तर संपूर्ण मानवतेच्या संघर्षाची गाथा बनते.

मराठी भाषा ही संत, समाजसुधारक, विचारवंत आणि साहित्यिक यांच्या समृद्ध परंपरेने घडलेली भाषा आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे, विंदा करंदीकर आणि अण्णाभाऊ साठे यांसारख्या अनेक थोर व्यक्तींनी आपल्या लेखणीतून समाजमन घडविले. या परंपरेचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी आजच्या तरुण पिढीवर आहे. लेखन प्रेरणा दिन हा त्या जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने, संशोधकाने, शिक्षकाने आणि साहित्यप्रेमीने आपल्या अनुभवांना, निरीक्षणांना आणि विचारांना शब्दरूप देण्याचा संकल्प या दिवशी करणे आवश्यक आहे.

लेखन ही समाजपरिवर्तनाची शांत पण अत्यंत प्रभावी प्रक्रिया आहे. तलवारीने जिंकलेली मने काळानुसार बदलतात; परंतु विचारांनी जिंकलेली मने कायमस्वरूपी परिवर्तन घडवितात. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून हेच सिद्ध करून दाखविले. त्यांच्या लेखणीत संघर्ष होता, पण द्वेष नव्हता; विद्रोह होता, पण विध्वंस नव्हता; अन्यायाविरुद्ध प्रखर आवाज होता, पण मानवतेवरील विश्वास कधीही डळमळला नाही. म्हणूनच त्यांचे साहित्य आजही सामाजिक समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेचे प्रभावी प्रतीक मानले जाते.

आजच्या काळात लेखन केवळ साहित्यनिर्मितीपुरते मर्यादित राहिलेले नाही. संशोधन, पत्रकारिता, विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, न्यायव्यवस्था, शिक्षण, उद्योग, सामाजिक कार्य आणि डिजिटल माध्यमे अशा प्रत्येक क्षेत्रात प्रभावी लेखनाचे महत्त्व वाढत आहे. विचार स्पष्टपणे आणि जबाबदारीने मांडण्याची क्षमता ही यशस्वी व्यक्तिमत्त्वाची ओळख बनली आहे. त्यामुळे लेखन प्रेरणा दिन हा केवळ साहित्यिक कार्यक्रम नसून ज्ञानाधिष्ठित समाज निर्माण करण्याच्या व्यापक ध्येयाशी जोडलेला उपक्रम आहे.


अण्णाभाऊ साठे यांचे जीवन हे आशावाद, संघर्ष आणि सर्जनशीलतेचा प्रेरणादायी प्रवास आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी जागतिक कीर्तीचे साहित्यिक म्हणून स्वतःचे स्थान निर्माण केले. त्यांनी सिद्ध केले की लेखक घडण्यासाठी संपन्न साधने नव्हे, तर जिद्द, संवेदनशीलता आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी आवश्यक असते. त्यांचे संपूर्ण जीवन नवोदित लेखकांसाठी एक प्रेरणादायी विद्यापीठ आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या विचारांचा वारसा जपत समाजहिताचे, मानवतावादी मूल्यांचे आणि सत्यनिष्ठेचे लेखन करणे.

१ ऑगस्ट रोजी साजरा होणारा 'लेखन प्रेरणा दिन' हा केवळ एका महान साहित्यिकाच्या जयंतीचे औचित्य नसून विचार, वाचन, लेखन आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा उत्सव आहे. प्रत्येक शैक्षणिक संस्थेत, प्रत्येक ग्रंथालयात आणि प्रत्येक घरात या दिवसाच्या निमित्ताने वाचनाची, चिंतनाची आणि लेखनाची नवी चळवळ सुरू झाली, तर तीच अण्णाभाऊ साठे यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या लेखणीने पेटविलेली सामाजिक जागृतीची मशाल आजच्या पिढीने ज्ञान, समता, न्याय आणि मानवतेच्या प्रकाशाने अधिक तेजस्वी करावी, हाच 'लेखन प्रेरणा दिनाचा' खरा संदेश आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,** (लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)

# आचार्य श्री हेमसागरजी गुरुदेव यांच्या ४७ व्या मंगल वर्षायोगाचा भव्य मंगल कलश स्थापना सोहळा २ ऑगस्ट रोजी

छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) – श्री १००८ चंद्रप्रभ खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर, आर्यनंदी कॉलनी, वेदांत नगर, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर येथे परमपूज्य सिध्दांत चक्रवर्ती आचार्य श्री १०८ हेमसागरजी गुरुदेव यांच्या ४७व्या मंगल वर्षायोगाचा शुभारंभ रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी अत्यंत श्रद्धा, भक्ती आणि धार्मिक उत्साहाच्या वातावरणात होणार आहे. आर्यनंदी कॉलनी येथे प्रथमच चातुर्मास व मंगल वर्षायोगाचे आयोजन होत असल्याने संपूर्ण जैन समाजात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. समाजासाठी हा ऐतिहासिक, गौरवशाली आणि प्रेरणादायी सोहळा ठरणार आहे.



या पावन प्रसंगी सकल दिगंबर जैन समाजाच्या उपस्थितीत भव्य मंगल कलश स्थापना सोहळा, आचार्य श्री हेमसागरजी गुरुदेव यांचे पूजन, गुरु वंदना तसेच विविध धार्मिक विधी आणि अनुष्ठानांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात परमपूज्य तपस्वी सम्राट आचार्य श्री १०८ सन्मतिसागरजी गुरुदेव यांच्या पावन प्रेरणेचा आणि मंगल आशीर्वादाचा लाभही भाविकांना मिळणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७.३० वाजता भगवान जिनेंद्रदेवांच्या पंचामृत अभिषेकाने होईल. त्यानंतर सकाळी ८.३० वाजता आचार्य श्री सन्मतिसागरजी गुरुदेव यांच्या विधानाचे आयोजन करण्यात येईल. दुपारी २.०० वाजता भव्य मंगल कलश स्थापना सोहळ्यास प्रारंभ होईल. यामध्ये आचार्य श्री हेमसागरजी गुरुदेव यांचे पूजन-अर्चन, गुरु वंदना, मंगल आशीर्वचन तसेच धर्मसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

वर्षायोगाचे मुख्य संयोजक श्री संजय पापडीवाल यांनी सांगितले की, वर्षायोगाच्या संपूर्ण कालावधीत दररोज धर्मसभा, प्रवचन, स्वाध्याय, पूजन, विधान तसेच विविध धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, त्यातून भाविकांना धर्म, संयम, संस्कार आणि आत्मकल्याणाची प्रेरणा मिळेल.

त्यांनी सकल दिगंबर जैन समाजातील सर्व बांधवांना सपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक आणि पुण्यमय सोहळ्याचा लाभ घ्यावा तसेच गुरुचरणी आपली श्रद्धा अर्पण करावी, असे आवाहन केले आहे. मंगल कलश स्थापना सोहळ्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादीची व्यवस्था शैलेन्द्र सेठी, अभिषेक सेठी, राजेश सेठी व प्रणय सेठी परिवार यांच्या वतीने करण्यात आली आहे. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन श्री १००८ चंद्रप्रभ खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर, आर्यनंदी कॉलनी, वेदांत नगर, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर तसेच सकल दिगंबर जैन समाज, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने करण्यात आले आहे. ही माहिती वर्षायोगाचे मुख्य संयोजक संजय पापडीवाल यांनी दिली. तसेच प्रचार-प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल, औरंगाबाद यांनी सकल दिगंबर जैन समाजातील सर्व भाविकांना या भव्य सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# भारत माते लाज वाटते तुझी लेकरं म्हणून घ्यायला

हे माँ भारती आज मोठ्या विदीर्ण मनाने माझे मनोगत व्यक्त करताना सर्वप्रथम मी तुझी क्षमा मागतो. ही क्षमा त्या असंख्य पालकांच्या वतीने ज्यांच्या 'कुलदीपकांनी' अथवा, 'कुलदीपिकानी' 'जंतर मंतर' वर तुझ्या अब्रूचे धिंडवडे काढले, तुझे प्रतिमा भंजन केले, तुझ्या आत्मसम्मानावर कधीही भरून न येणारा आघात केला.

माते, आज तुला नक्कीच आठवण होत असेल ती तुझ्या पायातील गुलामीच्या शृंखला तोडण्यासाठी, तुला स्वतंत्र करण्यासाठी ज्या लेकरांनी आपल्या सर्वस्वाचे बलिदान दिले, आपल्या जीवनाचा होमकुंड केला, शत्रूला मारता मारता मरेतो झुंजेन अशा आणाभाका घेतल्या त्या नरपुंगवांची, त्या स्वातंत्र्यवीरांची. आपल्या पुढच्या पिढ्याच्या उज्वल भविष्यासाठी, भवितव्यासाठी आणि 'आचंद्र सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे' हया दुर्दम्य इच्छेपोटी फासाची दोरी एखाद्या फुलमाळेसारखी आपल्या गळ्यात धारण करून घेणाऱ्या त्या असंख्य लेकरांची. संसार तर काय कावळे, चिमणी सुद्धा करतात, पण आपण आपली चूल बोळकी फोडल्याने जर भविष्यात भारत भूमीवर सोन्याचा धूर निघणार असेल तर यासारखे पुण्यकर्म अजून कुठले आहे असा आपल्या पत्नीला धीर देणारे, साखळदंडाने व बेड्यानी जखडलेले असतांना, तरटाची वल्कले परिधान करून आपल्या पत्नीचे सांत्वन करणाऱ्या 'बॅरिस्टर' सावरकरांची.आपला पती विदेशातून 'बॅरिस्टरी' करून परत आल्यावर त्याला सुटाबूटात पाहण्याची स्वप्ने पाहणाऱ्या 'माईची'. डोंगरीच्या कारागृहात तुरुंगाच्या गजापलीकडे उभ्या असलेल्या आपल्या 'सौभायाचा' निरोप घेताना ती माऊली म्हणाली की आमची काळजी करू नका, आम्ही एकाला दोघे आहोत पण आपण आपली काळजी घ्या.

तुला आठवण होत असेल ती सत्यभामाबाई टिळक यांची. आपला पती मंडालेच्या तुरुंगात खितपत पडलेला असताना त्याची वाट पाहातच या जगाचा निरोप घेणाऱ्या पतिव्रतेची. आपला एक मुलगा प्लेगच्या साथीने गमावला असताना दुसरा मुलगाही तापाने फणफणला आहे ही वार्ता टिळकांना लगेच न सांगण्याची काळजी घेणाऱ्या एका माऊलीची कारण टिळक आपल्या लेखनिकाकडून अग्रलेख लिहून घेत होते. हा अग्रलेख लिहून पूर्ण झाल्यावरच टिळकांना ही गोष्ट कळेल याची काळजी घेणाऱ्या एका मातेची.

सोन्याचा चमचा घेऊन जन्मलेल्या नेताजी सुभाषचंद्र बोस आणि त्यांच्या मातेला तू कशी बिसरशील. सगळी सुखे पायाशी लोळण घेत असताना, एकाहून एक सुंदर मुली सांगून येत असताना राष्ट्रकार्याला वाहून घेण्यासाठी आपल्याला विवाह करायचा नाही या आपल्या मुलाच्या निर्धारापुढे मान तुकवणाऱ्या त्या जननीने किती मानसिक यातना सोसल्या असतील. आपली तीनही मुले देशाच्या स्वातंत्र्यासाठी एकापाठोपाठ फासावर लटकवली गेल्याचे दुःख सहन करणाऱ्या चाफेकर बंधूच्या वीरमातेलाही तू कशी विसरशील?

देशाचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी कोवळ्या वयात सीमेवर लढताना आपल्या प्राणाची आहुती देणाऱ्या अरुण क्षेत्रपाल, मकरंद घाणेकर, किशोर भडभडे, दिलीप गुम्रे, अशोक ढवळे, विनायक गोरे, अनुज नायर, विक्रम बत्रा, मनोज पांडे, कर्नल महाडिक यासारख्या असंख्य योद्धयांच्या मातांचे सांत्वन तूच केलेस ना?

....आणि आज हे माते तुला काय बघावे, सोसावे लागत आहे? 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगा उद्धारी अशी महानता असलेल्या आपल्या माता भगिनीच्या उदरी जन्मलेल्या तथाकथित 'पुरोगामी' मुली स्वातंत्र्याचा गैरफायदा उठवत स्वैराचाराच्या आहारी गेलेल्या पाहून तुझ्या हृदयाला किती भोके पडत असतील? ज्या भूमीने आपल्याला जन्म दिला, फळवले, फुलवले त्याच 'मातृभूला ' तेरे तुकडे तुकडे होगे ' म्हणून उन्माद करणाऱ्या या तुझ्याच 'लेकी ' आहेत यावर तुझा विश्वास बसत नसेल ना? आज या तुझ्या 'सुशिक्षित ' मुलींनी गोपाळ गणेश आगरकर, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे यांनी स्त्री शिक्षणासाठी जी दिव्ये सोसली त्यावर बोळा फिरवला आहे असेच तुला वाटत असेल.'हेचि काय फळ मम तपाला ' असा विषाद तुला वाटत असेल तर नवल नाही. आजची ही उगवती पिढी कुठले भविष्य आपल्यासाठी निर्माण करणार आहे या काळजीने तुझ्या जीवाचे पाणी पाणी होत असेल. म्हणूनच आणि म्हणूनच हे भारत माते मी तमाम भारतवासियांच्या तर्फे तुझी माफी मागतो.पण अजूनही एक आशा पल्लवित आहे. धर्म जेव्हा संकटात येतो तेव्हा धर्माचे रक्षण करण्यासाठी आणि अधर्माचे निर्दालन करण्यासाठी प्रभू श्रीकृष्ण या धरेवर अवतार घेतील हा विश्वास हाच एकमेव तुला आधार वाटत असेल पण त्यासाठी शिशुपालाचे शंभर अपराध कधी भरतील याची वाट पाहणे एवढेच तुझ्या हाती आहे.

– रघुनंदन भागवत

# महा-रोजगार मेळाव्यास तरुणांचा उदंड प्रतिसाद ९ जणांना तात्काळ नियुक्ती पत्रे



छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) – छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, स्मार्ट सिटी आणि 'लाइटहाऊस' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या महा-रोजगार मेळाव्याला स्थानिक तरुणांचा उत्स्फूर्त व प्रचंड प्रतिसाद मिळाला. या मेळाव्यात ३५० हून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली असून, यावरून या स्थानिक उपक्रमावर तरुणांचा असलेला दृढ विश्वास व उत्साह स्पष्टपणे दिसून येतो.

या महा-रोजगार मेळाव्यात विविध क्षेत्रांतील १५ नामांकित कंपन्यांनी सहभाग नोंदवून रोजगाराच्या विपुल संधी उपलब्ध करून दिल्या. यामध्ये धूत ट्रान्समिशन सहयोग मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी, आर्म्स इंडिया प्रा. लि., एक्सेल प्लेसमेंट्स, एसबीआय क्रेडिट्स, बजाज ऑटो, निपुण स्किल्स, लेबरनेट, वर्धमान ऑटो आणि मेडिरिक्रूटर्स यांसारख्या आघाडीच्या कंपन्यांचा समावेश होता.

मेळाव्यात पार पडलेल्या प्राथमिक मुलाखतींनंतर पात्र ठरलेल्या ९ उमेदवारांना जागेवरच नियुक्ती पत्रे (जषषशी ङशींींशी) देऊन नोकरी पक्की करण्यात आली. याशिवाय, ८० हून अधिक तरुणांची मुलाखतीच्या दुसऱ्या फेरीसाठी निवड करण्यात आली आहे. सहभागी कंपन्यांशी झालेल्या चर्चेनुसार, या निवडक उमेदवारांसाठी मुलाखतींची दुसरी फेरी आगामी आठवड्यात आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी नगरसेवक शिवाजी दांडगे यांचा सहकार्य लाभला. उद्घाटन लाइटहाऊस टीमच्या पूजा ढेडे (सेंटर हेड), श्रीकांत साळवे (आऊटरीच समन्वयक), शेख परवेझ (प्लेसमेंट समन्वयक), वेदिका चौधरी (स्किलिंग समन्वयक), किरण हलवर (फॅसिलिटेर) आणि मुस्कान पारसवाणी (इंग्लिश ट्रेनर) यांच्या उपस्थितीत पार पडले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६

# १६.९६ लाख कर्जखाती आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध; दोन लाखांपर्यंतचे कर्ज शासनाकडून माफ

छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) – राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ जाहीर केली असून, या योजनेअंतर्गत कर्जमाफी, एकवेळ समझोता योजना (ओटीएस) आणि प्रोत्साहनपर लाभ असे तीन महत्त्वाचे घटक समाविष्ट करण्यात आले आहेत. दि. २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार या योजनेची अंमलबजावणी सुरू असून महा-आयटीच्या संगणकीय प्रणालीद्वारे प्रक्रिया पार पडत आहे.

योजनेनुसार १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या पीक कर्जांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच पुनर्गठन किंवा फेरपुनर्गठन केलेल्या पीक कर्जांचाही लाभ मिळणार आहे. ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत न फेडलेली कर्जरक्कम कर्जमाफीसाठी पात्र राहणार आहे.

कर्जमाफी अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज माफ करण्यात येणार आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना ३१ मार्च २०२७ पर्यंत दोन लाखांवरील रक्कम बँकेत जमा केल्यानंतर दोन लाख रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे.

याशिवाय, एकवेळ समझोता (ओटीएस) योजना लागू करण्यात आली असून दोन लाखांपेक्षा अधिक कर्ज




असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी मिळणार आहे. वेळेवर पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठीही शासनाने प्रोत्साहनपर लाभाची तरतूद केली आहे. सन २०२२-२३, २०२३-२४ किंवा २०२४-२५ या आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्ज घेऊन मुदतीत परतफेड केलेली आणि २०२५-२६ मधील पीक कर्जही वेळेत फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचे प्रोत्साहन अनुदान देण्यात येणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी बँकांनी महा-आयटी प्रणालीवर ३१.१७ लाख कर्जखात्यांची माहिती अपलोड केली आहे. यामध्ये १०.०१ लाख जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची आणि २१.१६ लाख व्यापारी बँकांची कर्जखाती समाविष्ट आहेत.

शासनाने व्यापारी बँकांना अनुत्पादित (एनपीए) कर्जखात्यांवर ठरावीक प्रमाणात 'हेअरकट' (सवलत) देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच १ एप्रिल २०२६ नंतर योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यावर कोणतेही अतिरिक्त व्याज आकारू नये, असेही स्पष्ट निर्देश सर्व बँकांना देण्यात आले आहेत. महा-आयटीने निकषांनुसार संगणकीय पडताळणी करून २५ जुलै २०२६ रोजी १६.९६ लाख कर्जखात्यांची यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध केली आहे. यामध्ये ७.०३ लाख सहकारी बँकांची आणि ९.९३ लाख व्यापारी बँकांची कर्जखाती समाविष्ट आहेत.

सध्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादीत दोन लाख रुपयांपर्यंत थकबाकी असलेल्या खात्यांचा समावेश असून, उर्वरित व दोन लाखांवरील कर्जखात्यांच्या याद्या पुढील टप्प्यात प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.

आधार प्रमाणीकरणाच्या वेळी शेतकऱ्यांनी आधार क्रमांक, कर्ज खाते क्रमांक आणि कर्जरकमेची अचूकता तपासून मान्यता द्यायची आहे. संबंधित यादी बँक शाखा, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, ग्रामपंचायत, चावडी तसेच गावपातळीवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. शासनाने स्पष्ट केले आहे की, गावात प्रसिद्ध झालेल्या यादीतील रक्कम ही हेअरकटनंतरची तडजोड रक्कम आहे. २५ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या यादीतील दोन लाख रुपयांपर्यंतची संपूर्ण पात्र रक्कम शासनाकडून माफ करण्यात येणार असून, शेतकऱ्यांना कोणतीही अतिरिक्त रक्कम बँकेत भरावी लागणार नाही.

२८ जुलै २०२६ पर्यंत ३.९६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले असून ही प्रक्रिया सुरू आहे.
प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर पात्र कर्जमाफीची रक्कम थेट लाभ हस्तांतरण (DBT) पद्धतीने संबंधित शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा केली जाईल. त्यानंतर संबंधित कर्जखाते नियमित होऊन शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

# लोकसंख्या स्थिरता पंधरवडा उत्साहात संपन्न; महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत कुटुंब कल्याण सेवांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर दि.३१ (प्रतिनिधी)- महानगरपालिकेचे महापौर समीर राजुरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, सभापती स्थायी समिती अनिल मकरिये, विरोधी पक्षनेता समीर साजिद, सभागृह नेता गोविंद केंद्रे, आरोग्य सभापती डॉ.सुनीता साळुंखे, आयुक्त अमोल येडगे , अतिरिक्त आयुक्त -२ श्रीमती कल्पिता पिंपळे यांच्या अध्यक्षतेखाली, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.उज्वला भामरे यांच्या मार्गदर्शनानुसार, RCH अधिकारी डॉ. मेघा जोगदंड यांचा समन्वयाने आरोग्य विभागाच्या वतीने दि. ११ ते २४ जुलै या कालावधीत 'लोकसंख्या स्थिरता पंधरवडा' प्रभावीपणे राबविण्यात आला. या वर्षीची थीम -'तरुण पिढीच्या आशा आणि आकांक्षा साकारणे- आज आणि भविष्यासाठी' .दि. ११ जुलै रोजी नेहरू नगर आरोग्य रुग्णालय येथे 'लोकसंख्या स्थिरता पंधरवडा ' निम्मित उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. त्याअनुशंगाने कुटुंब कल्याण कार्यक्रम अधिकारी डॉ कल्पना राठोड गुंजाळे यांनी कुटुंब नियोजनाबद्दल समुपदेशन केले,कुटुंब नियोजन पद्धती ,साधनांची माहिती व मोफत सेवा , अंतर राखण्याच्या तात्पुरत्या , कायमस्वरूपी व आधुनिक साधनांची माहिती दिली .

या पंधरवड्यादरम्यान नागरिकांना विविध कुटुंब कल्याण सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शहरातील मनपा रुग्णालयामध्ये कुटुंब कल्याण साधने व पद्धती प्रदर्शित करणारा कॉर्नर तयार करण्यात आला होता. पंधरवडा दरम्यान लेप्रोस्कोपिक सर्जन डॉ.गोविंद नरवणे,भूलतज्ज्ञ डॉ.पंडित शिरसाठ, भूलतज्ज्ञ डॉ दौंड आणि पूर्ण ल ेप्रोस्कोपी टीम यांनी महानगरपालिका रुग्णालय सिडको एन-८, सिल्क मिल कॉलनी, कैसर कॉलनी व नेहरू नगर येथे शिबिरात एकूण २६ लाभार्थ्यांवर कुटुंब कल्याण स्त्री शस्त्रक्रिया केल्यात .एप्रिल पासून आतापर्यंत एकूण २३२ लाभार्थ्यांवर कुटुंब कल्याण स्त्री शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या आहेत.

या अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, पंधरवड्यादरम्यान विविध कुटुंब नियोजन सेवांचा लाभ मोठ्या संख्येने नागरिकांनी घेतला. यामध्ये २६ कुटुंब कल्याण स्त्री शस्त्रक्रिया, ८० कॉपर-टी (Cu-T) बसविणे, १ पीपीआययुसीडी (प्रसूतीनंतर कॉपर-टी बसविणे), २५ अंतरा गर्भनिरोधक इंजेक्शन, ९४२ गर्भनिरोधक गोळ्यांचे वितरण करण्यात आले.

लोकसंख्या स्थिरता, मातृ व बाल आरोग्य संवर्धन तसेच कुटुंब नियोजनाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांनी दिलेला प्रतिसाद समाधा नकारक असून, भविष्यातही अशा आरोग्यविषयक अभियानांमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

# अल्लू अर्जुनने ८०० हून अधिक चाहत्यांना दिली खास भेट, ३ ते ५ लाख रुपयांच्या विमा संरक्षणाची घोषणा

**सर्वात** मोठ्या फॅन फॉलोइंगचा उल्लेख झाला की, सर्वप्रथम नाव घेतले जाते ते अल्लू अर्जुनचे. भारतातील सर्वात मोठ्या पॅन इंडिया सुपरस्टारपैकी एक मानल्या जाणाऱ्या अल्लू अर्जुनने आपल्या दमदार अभिनयाने आणि खास शैलीने कोट्यवधी चाहत्यांची मने जिंकली आहेत. तो नेहमीच आपल्या चाहत्यांसाठी वेळ काढतो, मग ते सोशल मीडियाच्या माध्यमातून असो किंवा प्रत्यक्ष भेटीत. त्यामुळेच तो प्रत्येक वेळी आपल्या चाहत्यांसाठी काहीतरी खास करताना दिसतो.

अलीकडेच हैदराबाद येथे झालेल्या ऑल इंडिया अल्लू अर्जुन फॅन असोसिएशन (AAFA) च्या वार्षिक कार्यक्रमात अल्लू अर्जुनने आपल्या चाहत्यांसाठी अशी घोषणा केली, ज्यामुळे सर्वांचेच मन जिंकले. त्याने आपल्या ८०० हून अधिक फॅन असोसिएशन सदस्यांसाठी ३ ते ५ लाख रुपयांपर्यंतच्या विमा संरक्षणाची घोषणा केली. एवढेच नाही, तर ही योजना लवकरच १०,००० हून अधिक चाहत्यांपर्यंत पोहोचवण्याचे त्याचे लक्ष्य आहे, जेणेकरून अधिकाधिक चाहत्यांना या उपक्रमाचा लाभ मिळू शकेल. आपल्या चाहत्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून अल्लू अर्जुनने उचललेले हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे मानले जात असून, त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यामुळेच अल्लू अर्जुन केवळ आपल्या चित्रपटांमुळेच नव्हे, तर चाहत्यांसाठी केलेल्या अशा उपक्रमांमुळेही लोकांची मने जिंकत



असतो. AAFA वार्षिक शिखर संमेलन २०२६ मध्ये अल्लू अर्जुनने आपल्या फॅन कम्युनिटीतील प्रत्येक सदस्यासाठी विशेष विमा योजनेची सुरुवात केली. या भव्य कार्यक्रमात जवळपास १,००० चाहते सहभागी झाले होते, त्यामुळे हा यंदाच्या वर्षातील सर्वात मोठ्या फॅन इव्हेंट्सपैकी एक ठरला. अल्लू अर्जुनने स्वतः सर्वांचे स्वागत केले, चाहत्यांसोबत वैयक्तिक छायाचित्रे काढली आणि त्यांच्यासोबत जेवणही वाढले.

या कार्यक्रमाला आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, महाराष्ट्र आणि ओडिशा येथील चाहते तसेच फॅन असोसिएशनचे सदस्य उपस्थित होते. दरम्यान, सलग अनेक ब्लॉकबस्टर चित्रपट देणाऱ्या अल्लू अर्जुनने आपल्या आगामी 'राका' या चित्रपटाच्या घोषणेनंतर पुन्हा एकदा प्रचंड चर्चा निर्माण केली आहे. दिग्दर्शक एटली यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होत असलेल्या या चित्रपटातील त्याचा नवा लूक केवळ पोस्टरद्वारे समोर आला असला, तरी त्याने देशभरात मोठी उत्सुकता निर्माण केली असून, हा आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या कॅरेक्टर रिव्हील्सपैकी एक मानला जात आहे.

आता संपूर्ण देशातील प्रेक्षक अल्लू अर्जुनला पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी उत्सुक आहेत. त्याच्याकडे लोकेश कनगराज यांच्यासोबतचा AA23, पुष्पा ३: द रॅम्पेज आणि इतर अनेक मोठे प्रोजेक्ट्सही पाइपलाइनमध्ये आहेत.

# टाऊन हॉलमध्ये पुराणवस्तू संग्रहालयाच्या तात्पुरत्या स्थलांतराबाबत महापौरांच्या उपस्थितीत बैठक

छत्रपती संभाजीनगर दि.३१ (प्रतिनिधी)- टाऊन हॉल येथील राज्य पुरातत्त्व विभागाच्या सोनेरी महालस्थित पुराणवस्तू संग्रहालयाचे काही काळासाठी टाऊन हॉलमध्ये तात्पुरते स्थलांतर करण्यासंदर्भात आज महापौर समीर राजूरकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली.



बैठकीस महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, शहर अभियंता संजय कोंबडे, राज्य पुरातत्त्व विभागाचे अधिकारी तसेच महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी पुराणवस्तू संग्रहालयाचे तात्पुरते स्थलांतर, टाऊन हॉल इमारतीची तयारी आणि आवश्यक सुविधा याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. टाऊन हॉल इमारतीतील पाणी निचऱ्याची व्यवस्था, किरकोळ दुरुस्ती तसेच इतर प्राथमिक कामे महानगरपालिकेमार्फत तातडीने करण्यात येतील, असे बैठकीत निश्चित करण्यात आले.

टाऊन हॉलला ऐतिहासिक वैभव प्राप्त करून देण्यासाठी राज्य पुरातत्त्व विभागानेही पुढाकार घ्यावा, यावर दोन्ही विभागांमध्ये सहमती झाली.

यावेळी महापौर समीर राजूरकर म्हणाले, 'भविष्यात राज्य पुरातत्त्व विभागाने पुराणवस्तू संग्रहालय पुन्हा आपल्या ताब्यात घेतले, तरी टाऊन हॉलचा वापर कायमस्वरूपी पुराणवस्तू संग्रहालय म्हणून करता येईल. त्यादृष्टीने या वास्तूचा नियोजनबद्ध विकास करणे आवश्यक आहे.'

महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे म्हणाले, 'टाऊन हॉलमधील आवश्यक प्राथमिक कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांना निर्देश देण्यात येतील. तसेच येथे येणाऱ्या पर्यटकांच्या सोयीसाठी टाऊन हॉल परिसरात पुरेशी पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून देण्याचीही आवश्यकता आहे.' बैठकीतील विविध विषयांवर महानगरपालिका आणि राज्य पुरातत्त्व विभाग यांच्यात सकारात्मक सहमती झाली असून, या निर्णयांची अंमल बजावणी करण्यासाठी लवकरच पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

# मनपातील १४ अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त; सेवेला गौरवपूर्ण निरोप



छत्रपती संभाजीनगर दि.३१ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील विविध विभागांमध्ये अनेक वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावलेल्या एकूण १४ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती स्वीकारली. महानगरपालिकेच्या वतीने त्यांच्या दीर्घ, समर्पित व कर्तव्यनिष्ठ सेवेला कृतज्ञतापूर्वक गौरव करण्यात आला. सेवानिवृत्त होणाऱ्यांमध्ये उदय वसंतराव माकोशी (सहाय्यक आयुक्त, सचिव विभाग), प्रभाकर पुंजाजी शिंदे (मुख्याध्यापक, शिक्षण विभाग) आणि मधुकर विठ्ठलराव चौधरी (कनिष्ठ अभियंता, ज्ञान क्र. ६) यांचा समावेश आहे. या तिघांसह एकूण १४ अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये उल्लेखनीय योगदान दिले. महानगरपालिकेच्या वतीने सर्व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या निरोगी, आनंदी आणि समाधानकारक भावी आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# शहरात बनावट तूप-पनीर रॅकेटचा पर्दाफाश! ३.१२ लाखांचा साठा जप्त; डेअरीचा परवाना तात्काळ निलंबित

छत्रपती संभाजीनगर दि.३१ (प्रतिनिधी)- 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनाने छत्रपती संभाजीनगर शहरात भेसळयुक्त दुग्धजन्य पदार्थांविरोधात मोठी कारवाई करत एमआयडीसी चिकलठाणा येथील एका डेअरी उत्पादन युनिटवर छापा टाकला. या कारवाईत तब्बल ३ लाख १२ हजार ३८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधित डेअरीचा परवाना तात्काळ निलंबित करण्यात आला आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे एमआयडीसी चिकलठाणा परिसरातील सर्व्हिस इंडस्ट्री प्लॉट क्रमांक सी-४५ येथे असलेल्या अमोल दूध डेअरीवर धाड टाकण्यात आली. तपासादरम्यान डेअरीमध्ये मोठ्या प्रमाणात नॉन-फूड ग्रेड सोयाबीन तेलाचा साठा आढळून आला. हे तेल कथितरीत्या पनीर आणि गाईचे तूप तयार करण्यासाठी वापरले जात असल्याची माहिती समोर आली आहे.

कारवाईदरम्यान अधिकाऱ्यांनी डेअरीमधून एकूण ९५० किलो वजनाचा साठा जप्त केला. यात २९९ किलो तूप, १९९ किलो साय, १७४ किलो पनीर आणि २७८ किलो रिफाइंड सोयाबीन तेलाचा समावेश आहे.

**जप्त करण्यात आलेला मुद्देमाल**

तूप : २९९ किलो – किंमत १,६७,४४०

साय (क्रीम) : १९९ किलो – किंमत ५५,७२०

पनीर : १७४ किलो – किंमत ४५,२४०

रिफाइंड सोयाबीन तेल : २७८ किलो – किंमत ४४,४८०

तपासादरम्यान संबंधित डेअरीकडून शहरातील लक्ष्मी डेअरीच्या टीव्ही सेंटर, कामगार चौक आणि दर्गा रोडवरील श्रीराम चौक येथील तीन विक्री केंद्रांना पनीर आणि तुपाचा पुरवठा केला जात असल्याचे उघड झाले. त्यानंतर अन्न सुरक्षा विभागाने या तीनही दुकानांवर धडक कारवाई करत गाईच्या तुपाचे नमुने तपासणीसाठी घेतले



आणि ४१ किलो तूप (किंमत २९,३००) जप्त केले.

या गंभीर प्रकाराची दखल घेत प्रशासनाने संबंधित उत्पादन युनिटचा परवाना तात्काळ निलंबित करून आस्थापना बंद केली आहे. पुढील तपास आणि प्रयोगशाळेच्या अहवालानंतर संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी वर्षा रोडे, कीर्तिका झाडे, प्रदन्या सुरसे, फरीद सिद्दीकी आणि योगेश चिभाडे यांनी सहायक आयुक्त दयानंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली केली. तसेच संयुक्त आयुक्त श्रीकांत करकळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेमुळे भेसळखोरांवर मोठा आघात झाला असून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांविरोधात प्रशासनाचा दणका कायम राहणार आहे.

# 'स्तन आरोग्य अभियानाला' महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद (मॅमोग्राफी)

छत्रपती संभाजीनगर दि.३१ (प्रतिनिधी)- महानगरपालिकेचे महापौर समीर राजुरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, सभापती स्थायी समिती अनिल मकरिये, विरोधी पक्षनेता समीर साजिद, सभागृह नेता गोविंद केंद्रे, सभापती वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती श्रीमती डॉ. सुनीता सोळुंके, आयुक्त अमोल येडगे तसेच अति. आयुक्त-२ कल्पिता पिंपळे यांच्या आदेशानुसार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आरोग्य विभाग व कमलनयन बजाज रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ जुलै २०२६ रोजी कमलनयन बजाज रुग्णालय, बीड बायपास येथे 'स्तन आरोग्य अभियान' अंतर्गत शहरव्यापी मोफत व सवलतीच्या दरात डिजिटल मॅमोग्राफी स्क्रीनिंग कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

या अभियानात पाहिल्या टप्पयात सर्व आशा वर्कर, मनपा आरोग्य विभागातील महिला अधिकारी व कर्मचारी यांचे स्क्रीनींग सुरु असून, दि. २२ जुलै ते ३१ जुलै पर्यंत एकूण २०९ महिलांनी स्तन आरोग्य तपासणी करून घेतली आहे. तपासणीदरम्यान आवश्यकता वाटल्यास महिलांना पुढील वैद्यकीय सल्ला, निदान व उपचारासाठी तज्ज्ञ डॉक्टरांकडुन मार्गदर्शन घेण्यात येत आहे.

राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग प्रतिबंधक व नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या या अभियानाचा मुख्य उद्देश स्तन कर्करोगाचे लवकर निदान करून वेळेत उपचार उपलब्ध करून देणे हा आहे. प्राथमिक अवस्थेत स्तन कर्करोगाचे निदान झाल्यास उपचार अधिक प्रभावी ठरत असल्याने महिलांनी नियमित आरोग्य तपासणी करणे आवश्यक आहे.

**या अभियानांतर्गत खालील महिलांना मोफत तपासणी करण्यात येणार आहे**

* ४० वर्षांपेक्षा अधिक वयाच्या दारिद्र्यरेषेखालील अथवा समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील सर्व महिला.

* ३० वर्ष ते ४० वर्ष वयोगटातील BPL अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिला ज्यांच्या प्रथम श्रेणीतील नातेवाईकांमध्ये (आई, बहीण किंवा मुलगी) स्तन कर्करोगाचा इतिहास आहे.

* आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांसाठी सवलतीच्या दरात डिजिटल मॅमोग्राफी तपासणी करण्यात येणार आहे व BPL महिलासाठी मोफत.

छत्रपती संभाजीनगर शहरातील वरील नमुदप्रमाणे सर्व पात्र महिलांनी या अभियानाचा लाभ घेऊन स्वतःच्या आरोग्याबाबत जागरूक राहावे व वेळेत तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात येत आहे.

# सेवानिवृत्तीनंतर ही शिक्षकांचे कार्य समाजोपयोगी-मा.आमदार उदयसिंह राजपूत

कन्नड/वैजापूर दि.३१ (प्रतिनिधी)- 'जगाचे कधी काळी कल्याण व्हायचे असेल तर ते सेवेत असणारे शिक्षक व सेवा निवृत्त असणारे शिक्षक यांच्या अध्ययन-अध्यापन व समाजोपयोगी कार्यातूनच शक्य आहे',असे प्रतिपादन कन्नड चे माजी आमदार उदयसिंह राजपूत यांनी कन्नड येथील सेवा निवृत्त शिक्षक वयाची८६वर्षे पूर्ण करणारे कन्हैयालाल अहिरराव गुरुजी यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात शुक्रवार(ता,३१)रोजी केले.ते पुढे म्हणाले की,'शिक्षकांचे संस्कार, हे विद्यार्थ्यांच्या जीवनाला सुयोग्य असा आकार देऊन त्यांचे उज्वल भवितव्य घडवितात,त्यापैकी गुरुवर्य श्रीअहिरराव गुरुजी आहेत. कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष वसंत सबनीस होते,

तर प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमान नगराध्यक्ष जावेद शेठ.नगरसेवक बंटी सुरे,कन्नड पेन्शनर्स श्री कुंभकर्ण, संभाजीनगर पेन्शनर्स असोसिएशनचे सर्वश्री डॉ.देशमुख,श्री. अमृतसर, श्री घुगे,नंदुरबारचे पेन्शनर्स सचिवदिलीपपाटील,शिरपूरचे लेखक व व्याख्याते मोहनदास भामरे, खुलताबाद च्या अध्यक्ष श्रीमती घोडके ताई,सिल्लोड चे श्री देशमुख, ,वैजापूर चे अध्यक्ष ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत.सेवानिवृत्त ८६वर्षीय शिक्षक कन्हैयालाल अहिरराव यांच्या वाढदिवसानिमित्त कन्नड पेन्शनर्स असोसिएशनचे श्री परदेशी दादा,सरदारसिंह परदेशी, भरतसिंह राजपूत, श्री. घोडके, श्री.सोनवणे, श्री. सूर्यवंशी,व सदस्यांनी हा अभिष्टचिंतन सोहळा व पेन्शनर्स आनंद मेळावा आयोजित केला होता. मोहनदास भामरे यांनी उतरत्या जीवनात आनंदी कसे जगावे या विषयी मार्गदर्शन केले .दिलीप पाटील यांनी पेन्शनर्स जीवन जगताना सामाजिक बांधील की जपून आनंदी रहावे असे संबोधले.तर वसंत सबनीस यांचे ही समयोचित भाषण झाले.श्री. परदेशी दादा व कन्हैयालाल अहिरराव यांनी उपस्थितांचे आभार मानले.सूत्र संचलन वैजापूरचे ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले तर आभार संघटनेचे सचिव घोडके यांनी मानले.


दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM :
**OLD NAME :** HASINA BEGUM HAJI RAFIUDDIN
TO
**NEW NAME :** HASEENA BEGAM MOHMMAD RAFIYODDIN
(AS PER MY AADHAR CARD AND PAN CARD)
**Address :** Tilak Nagar Kannad 431103 District Aurangabad State Maharashtra India.

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM :
**OLD NAME :** HAJI RAFIUDDIN QAMRUDDIN
TO
**NEW NAME :** MOHAMMAD RAFIUDDIN QUMRUDDIN
(AS PER MY AADHAR CARD AND PAN CARD)
**Address :** H NO.17/A, Chandmari Masjid Road, New Nandanvan Colony, Aurangabad 431001 Maharashtra India.

Truhome FINANCE

## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१;
**दूरध्वनीः** १८०० १०२ ४३४५, **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;

**खाजगी कराराद्वारे सरफेसी कायदा, २००२ च्या तरतुदी अंतर्गत विक्रीसाठी मालमत्ता**
**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ८ सह वाचलेल्या नियम ९ अंतर्गत खाजगी कराराद्वारे विक्रीची सूचना**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदारांना आणि जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी मेसर्स श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) कडे गहाण ठेवलेल्या/आकारलेल्या खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता, ज्यांचा भौतिक ताबा ट्रूहोम फायनान्स लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, त्या ०६.०५.२०२५ रोजी खाजगी कराराद्वारे **"जसे आहे तिथे आहे", "जसे आहे जे आहे" आणि "जे काही आहे ते आहे"** या तत्त्वावर विकल्या जातील, जसे की कर्जदार आणि जामीनदारांकडून ट्रूहोम फायनान्स लिमिटेडची देय रक्कम वसूल करण्यासाठी, सारणीमध्ये नमूद केल्याप्रमाणे. अधिकृत अधिकारी याद्वारे सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ आणि ९ च्या अटींनुसार खाजगी कराराद्वारे टेबलमध्ये नमूद केल्याप्रमाणे मालमत्तेची विक्री करण्याची सूचना देत आहेत.

| कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवण्याऱ्यांचे नाव | मागणी सूचनेची आणि वसुलीची रक्कम तारीख | राखीव किंमत (रु.) , ईएमडी रक्कम आणि खाजगी करार अंमलबजावणी तारीख | संपर्क व्यक्ती तपशील – (एओ आणिविल्हेवाट लावण्याची टीम) |
|---|---|---|---|
| **१. सौ. सुनीता जनार्धन निर्मळ (कर्जदार)**<br>**२. श्री. सूरज फुलचंद उमाप (सह-कर्जदार)**<br>**३. श्री. शुभम फुलचंद उमाप (सह-कर्जदार)**<br>**सर्वांचे निवासी पत्ता :प्लॉट क्र. ११-बी, छत्रपती नगर, मल्हार चौक, गारखेडा, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र – ४३१००९.**<br>**कर्ज खाते क्रमांक : SBTHAURD0000928 / STUHAURD0000932**<br>**ताबा दिनांक व ताबा प्रकार**<br>**दिनांक १०/०७/२०२६ रोजी प्रत्यक्ष ताबा** | मागणी सूचना दिनांक : १७/०१/२०२६<br>मागणी सूचना रक्कम :कर्ज खाते क्रमांक SBTHAURD0000928 अंतर्गत दिनांक १२/०१/२०२६ रोजी देय असलेली रु. ६२,६५,७१७/- (अक्षरी रुपये बासष्ट लाख पासष्ट हजार सातशे सतरा फक्त) तसेच कर्ज खाते क्रमांक STUHAURD0000932 अंतर्गत दिनांक १२/०१/२०२६ रोजी देय असलेली रु. २६,९८,२०५/- (अक्षरी रुपये सव्वीस लाख अठ्ठ्याण्णव हजार दोनशे पाच फक्त) व त्यावरील करारनिहाय पुढील व्याज, सदर मागणी सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत अदा करावयाचे आहे. | **राखीव किंमत:**<br>रु. १,००,००,०००/-<br>(अक्षरी रुपये एक कोटी फक्त)<br>**ईएमडी रक्कम:**<br>रु. ११,५०,०००/-<br>(अक्षरी रुपये अकरा लाख पन्नास हजार फक्त)<br>**खाजगी करार अंमलबजावणी तारीख:** १७/०८/२०२६ | **देबज्योती रॉय**<br>**९८७४७०२०२१**<br>**सतीश बनसोड**<br>**९७३००४७५७२**<br>**मयुरेश जाधव**<br>**९८३३०१७२२१**<br>**अजय झांझोट**<br>**९८२३३९०९९०**<br>**ग्राहक सेवा क्रमांक : ०२२ - ४००८१५७२** |

**संपत्तीचे विवरण**

छत्रपती नगर, गारखेडा, ता. व जि. छत्रपती संभाजीनगर – ४३१००९ येथील सर्व्हे क्र. १९/२ मधील प्लॉट क्र. ११-बी, क्षेत्रफळ १४३.१२ चौ. मीटर असलेली सर्व ती मिळकत.
चतु:सीमा :पूर्वेस : प्लॉट क्र. १२पश्चिमेस : प्लॉट क्र. ११-अदक्षिणेस : ५० फूट रुंदीचा रस्ताउत्तरेस : प्लॉट क्र. ०८

- **विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) च्या वेबसाइटला देखील भेट देऊ शकता.**
- **इच्छुक बोलीदारांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात बँकेचे नाव- ॲक्सिस बँक लिमिटेड शाखा: वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई बँक खाते क्रमांक-चालू खाते क्रमांक ९११०२००४५६७७६३३ आयएफएससी कोड- यूटीआयबी 0000230 येथे जमा करावी:**
- **विक्रीच्या तारखेपूर्वी गहाणखतदार/कर्जदारांना अतिरिक्त व्याजासह एकूण देयके भरण्याची शेवटची संधी दिली जाते, अन्यथा सुरक्षित मालमत्ता खाजगी कराराद्वारे वरील वेळापत्रकानुसार विकली जाईल.**

ठिकाण - छत्रपती संभाजीनगर
दिनांक - ०१/०८/२०२६

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )